शनिवार, 21 मे 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 01 ⊙ अंक - 262
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 21 MAY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-01 ● ISSUE-262 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5


# पुरेशा पावसाशिवाय पेरणी नको

## कृषिमंत्र्यांनी केले शेतकऱ्यांना आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राज्यातील काही भागात कालपासून जोरदार पाऊस पडत आहे. यामुळे शेतकरी पेरणीच्या तयारीला लागला आहे दरम्यान हा पाऊस कदाचित हुलकावणी देण्याची शक्यता आहे. मान्सूनपूर्व पाऊस असल्याने कदाचित हा पाऊस थांबल्यानंतर पुढचे काही दिवस पाऊस नाही लागल्यास पेरणी केलेल्या पिकाचे मोठे नुकसान होते. दरम्यान आज कृषी मंत्री दादा भुसे यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले.**



ते म्हणाले की, खरीप हंगाम 2022 मध्ये प्रमुख अन्नधान्य पिकांचे 151.33 लाख हेक्टर क्षेत्र लागवडीखाली अपेक्षित आहे. खरीप हंगामात खोडमाशीच्या प्रादुर्भावाची शक्यता गृहीत धरून तिचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना ही त्यांनी भुसे यांनी दिल्या.
हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदा पुरेसा पाऊस होणार आहे. परंतु पुरेसा पाऊस झाल्याशिवाय शेतकरी बांधवांनी पेरणी करू नये, असे आवाहन कृषीमंत्री दादा भुसे यांनी पत्रकार परिषदेत दिले आहे. शेतमाल निर्यातीसाठी असलेल्या मालाच्या दर्जा तपासणी (ट्रेसिबिलीटी) नोंदणीच्या प्रणालीमध्ये देशातील 72,280 शेतकऱ्यांपैकी महाराष्ट्रातील 62,344 शेतकरी आहेत. भारतातील 129 भौगोलिक मानांकनापैकी महाराष्ट्रातील 26 आहेत. देशात भौगोलिक मानांकन नोंदणीकृत शेतकरी 5,260 आहेत. त्यापैकी 4390 शेतकरी महाराष्ट्रातील आहेत.
महाराष्ट्रातील द्राक्ष, डाळींब, आंबा, केळी, कांदा, मिरची या पिकांच्या निर्यातीत आघाडीवर आहे. देशाच्या एकूण निर्यातीच्या 65 टक्के फळे, 55 टक्के भाजीपाला महाराष्ट्रातून निर्यात होतो. देशात सर्वाधिक 4500 शेतकरी उत्पादक कंपन्या महाराष्ट्रात आहेत. प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य उद्योग योजनेत (पीएमएफएमई) महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. ही आपल्या महाराष्ट्राची बलस्थाने असल्याचे ते म्हणाले.

### मान्सून या दिवशी होणार सक्रिय होणार

दरम्यान हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, मान्सून येत्या दोन दिवसांत आणखी पुढे सरकण्याची शक्यता आहे. पुढील दोन दिवसांत दक्षिण बंगाल उपसागराच्या काही भागात तसेच अंदमान समुद्र आणि बंगाल उपसागराच्या पूर्वेकडील काही भागात मान्सूनची वाटचाल सुरू आहे आहे.
राज्यात मान्सून सक्रीय होण्यासाठी 12 ते 15 जून उजाडण्याची शक्यता आहे. मुंबईत मान्सूनच्या आगमनाची अधिकृत तारीख 11 जून असल्याचे हवामान खात्याकडून सांगण्यात आले. दरम्यान राज्यातील काही भागात मान्सून पूर्व हवामान तयार होत असल्याने पावसाची शक्यता आहे.

### कोल्हापूर सांगली जिल्ह्यात पावसाची रिपरिप

कोल्हापूर, सांगली, सोलापूर, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, या जिल्ह्यात पावसाने जोरदार हजेरी लावली. हवामान खात्याच्या माहितीनुसार गोवा, कर्नाटकमार्गे वारे वाहत असल्याने कोल्हापूर सांगली आणि उस्मानाबाद या जिल्ह्यांना हवामान खात्याकडून अलर्ट जारी करण्यात आला होता. दरम्यान काल (दि.19) संध्याकाळपासून कोल्हापूर सांगली जिल्ह्यात अतिवृष्टी होत आहे.



# भाजपने पुढील 25 वर्षांचे ध्येय निश्चित करायला हवे : मोदी

आधुनिक केसरी न्यूज

**जयपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पुढील २५ वर्षांवर लक्ष केंद्रीत करण्याचे आवाहन पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना केले. आपण आता पुढील २५ वर्षांसाठीचे उद्दिष्ट निश्चित करत आहोत. आता वेळ आली आहे की भाजपाने पुढील २५ वर्षांसाठीचे ध्येय निश्चित करायला हवे. हे ध्येय सर्व अडचणींवर मात करत सातत्याने देशाच्या नागरिकांसाठी काम करत राहाणे आणि त्यांच्या आकांक्षांची पूर्तता करणे हे असायला हवे, असे मोदी म्हणाले. राजस्थानमधील जयपूरमध्ये भाजपच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजप नेत्यांना संबोधित केले. मोदींनी स्वतः ट्विट करून ही माहिती दिली. भाजप कार्यकर्त्यांना संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, देशासमोरील आव्हानांचा सामना आपल्याला करायचा आहे.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे बैठकीत सहभाग घेतला. राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्यासह भाजप पदाधिकाऱ्यांच्या या बैठकीला भाजपचे सर्व बडे नेते उपस्थित होते. यावेळी पीएम मोदी म्हणाले की, आज आपण पाहत आहोत की, काही पक्षांची इकोसिस्टम संपूर्ण ताकदीनिशी देशाच्या मुख्य समस्यांवरुन दुसरीकडे वळवण्यात गुंतलेली आहे. अशा पक्षांच्या फंदात आपण कधीही पडू नये. आपण कधीही शॉर्टकट घेऊ नये. देशाच्या हिताशी निगडीत जे काही मूलभूत मुद्दे आहेत, जे मूळ मुद्दे आहेत त्यावर आपल्याला पुढे जायचे आहे.

### जगाला भारताकडून खूप अपेक्षा

यादरम्यान पीएम मोदी म्हणाले की, जेव्हा आपण भाजपचे स्वरुप पाहतो, तेव्हा आपल्याला अभिमान वाटतो. मी पक्षाच्या त्या सर्व लोकांना नमन करतो ज्यांनी स्वतः ला या पक्षाच्या उभारणीत खर्च केले. 21व्या शतकाचा काळ भारतासाठी खूप महत्त्वाचा आहे. जग आज भारताकडे मोठ्या अपेक्षेने पाहत आहे. त्याचप्रमाणे भारतात भाजपप्रती जनतेची विशेष आपुलकी दिसून येते. देशातील जनतेच्या अपेक्षा पूर्ण करायच्या आहेत. देशासमोर जी आव्हाने आहेत, त्या प्रत्येक आव्हानावर देशातील जनतेच्या सोबतीने मात करायची आहे.

### भाजपने लोकांची विचारसरणी बदलली

आपल्या देशात एकेकाळी चालढकलपणा केला जायचा. ना त्यांना सरकारकडून अपेक्षा होती, ना सरकारने त्यांच्या प्रति उत्तरदायित्वाचा विचार केला होता. पण, 2014 नंतर भाजपने या विचारसरणीतून देशाला बाहेर काढले.
देशाच्या उज्ज्वल भवितव्याची मी पूर्ण आतुरतेने वाट पाहत आहे. मी देशातील तरुणांना आत्मविश्वासाने भरलेले पाहतो, बहिणी-मुलींना काहीतरी करण्याची हिंमत दाखवून पुढे जाताना पाहतो, तेव्हा माझा आत्मविश्वासही अनेक पटींनी वाढतो.
मोदी पुढे म्हणाले की, देशातील लोकांची ही आशा आणि आकांक्षा आपली जबाबदारी खूप वाढवते. स्वातंत्र्याच्या या अमृत कार्यात देश स्वतःसाठी पुढील 25 वर्षांची उद्दिष्टे ठरवत आहे. भाजपसाठी हीच वेळ आहे, पुढील 25 वर्षांची उद्दिष्टे निश्चित करण्याची, त्यांच्यासाठी सतत काम करण्याची. पंडित दीनदयाल उपाध्याय यांचे अखंड मानवतावाद आणि अंत्योदय हे आपले तत्त्वज्ञान आहे. आपले विचार हे डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांचे सांस्कृतिक राष्ट्रीय धोरण आहे. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास' हा आमचा मंत्र आहे, असे मोदी म्हणाले.

# ज्ञानवापी प्रकरण जिल्हा कोर्टाकडे

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** वाराणसी मधील ज्ञानवापी मशिदी प्रकरणावर सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरू आहे. या प्रकरणावर सुप्रीम कोर्टाने तीन पर्याय सूचवले आहे. तसेच, जस्टिस डीवाई चंद्रचूड़ यांनी जिल्हा सत्र न्यायालयाने आपल्या अधिकारानुसार सुनावणी घ्यावी, कारण हा न्यायालयीन अनुभवाचा अधिकार आहे. असे मत नोंदवले आहे. तसेच, सुप्रीम कोर्टाने यापूर्वीचा आदेश कायम ठेवला आहे. वाराणसी सत्र कोर्ट सुनावणी घेऊ शकणार नाही, पुढील ८ आठवड्यापर्यंत आदेश कायम आहे. सर्व प्रकरण आता जिल्हा कोर्टाकडे वर्ग करण्याचे आदेश दिले आहे. ज्ञानवापी मशिदीमध्ये शिवलिंग सापडल्याचा दावा केला जात आहे. या प्रकरणावर सुप्रीम कोर्टामध्ये जस्टिस डीवाई चंद्रचूड़, जस्टिस नरसिम्हा आणि जस्टिस सूर्यकांत यांच्या बेंचसमोर सुनावणी पार पडली. यावेळी कोर्टाने निर्देश दिले की, खालच्या कोर्टाने मुस्लिम गटाच्या अर्जावर लवकरात लवकर सुनावणी घ्यावी आणि विषय निकाली काढावा. तसेच, जोपर्यंत सत्र न्यायालय या प्रकरणाच्या अर्जावर निर्णय घेत नाही. तोपर्यंत आमचा अंतरिम आदेश कायम राहणार आहे, असे कोर्टाने स्पष्ट केले.

# लालू यादव यांच्या अडचणी वाढल्या, सीबीआयकडून १७ ठिकाणी छापेमारी

आधुनिक केसरी न्यूज

**पाटणा :** राष्ट्रीय जनता दलाचे सुप्रीमो लालू प्रसाद यादव यांच्या १५ ठिकाणी सीबीआयच्या वेगवेगळ्या पथकांनी छापे टाकले. शुक्रवारी सकाळी ही कारवाई करण्यात आली आहे.
इतकंच नाहीतर एक टीम १० सर्कुलर रोड इथंही पोहोचली आहे. जे राबडी देवी यांचे अधिकृत निवासस्थान आहे. तिथेही पथक तपास करत असल्याची माहिती आहे. राबडी निवासस्थानी पोहोचलेल्या सीबीआयच्या टीममध्ये महिला आणि पुरुष दोघांचाही समावेश असल्याचे सांगण्यात येत आहे. सीबीआयच्या या पथकात एकूण १० लोक आहेत जे राबरी निवासस्थानी चौकशी करत आहेत. यावेळी कोणालाही घरात प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आली आहे.
राबरी निवासस्थानावर छापा टाकण्याबाबत सीबीआयचे अधिकारी काहीही बोलण्यास तयार नाहीत. पण हाती आलेल्या सूत्रांच्या माहितीनुसार, हे प्रकरण रेल्वे भरतीशी संबंधित आहे. जेव्हा लालू प्रसाद यादव रेल्वेमंत्री होते. मात्र, अद्याप याला अधिकृत दुजोरा देण्यात आलेला नाही.

### लालू व मुलीवर पुन्हा गुन्हा दाखल


एएनआय वृत्तसंस्थेनुसार, केंद्रीय अन्वेषण ब्युरोने आरजेडी सुप्रीमो लालू यादव आणि त्यांच्या मुलीविरोधात भ्रष्टाचाराचा नवीन गुन्हा दाखल केला आहे. लालू यादव यांच्या या नव्या प्रकरणासंदर्भात दिल्ली आणि बिहारमधील एकूण १७ ठिकाणी छापे टाकण्यात आले आहेत.

### रेल्वे भरतीमध्ये नोकरीच्या बदल्यात जमीन

हे संपूर्ण प्रकरण लालू यादव यांच्या रेल्वेमंत्री असतानाचे असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. आरआरबीमध्ये लालूंच्या कार्यकाळात झालेल्या गोंधळाबाबत सीबीआयने छापे टाकले आहेत. २००४ ते २००९ या लालूंच्या रेल्वेमंत्रिपदाच्या काळात अनेकांना राइट ऑफ करून रेल्वेत नोकऱ्या दिल्याचा आरोप आहे. ७ जुलै २०१७ रोजी लालूंच्या निवासस्थानावर शेवटचा छापा टाकण्यात आला होता.
लालू यादव यांची कन्या रोहिणी आचार्य सीबीआयच्या छापेमारीनंतर संतापल्याचे पाहायला मिळत आहे. त्यांनी एकापाठोपाठ एक अनेक ट्विट केले असून जातीगणनेवरून लालू यादव यांना घाबरवण्यासाठी हा छापा टाकण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# कोकणच्या हापूसची अमेरिकेला भुरळ

## पुण्यातून थेट वॉशिंग्टन येथे होणाऱ्या आंबा महोत्सव कार्यक्रमात जाणार




आधुनिक केसरी न्यूज

पुणे : मागच्या दोन वर्षांपासून कोरोनामुळे फळांचा राजा आंबा भारताबाहेर विक्रीस गेला नव्हता. आंब्याला परदेशातून खूप मागणी असते परंतु कोरोनामुळे यात खंड पडला होता. सध्या अमेरिकेत आंब्याची निर्यात होत असल्याची माहिती मिळत आहे. दोन वर्षांच्या कालावधीनंतर अमेरिकेत भारतीय आंब्याची निर्यात पुन्हा सुरू झाल्यामुळे, या आठवड्यात वॉशिंग्टन येथे होणाऱ्या आंबा महोत्सव कार्यक्रमात काही प्रसिद्ध जातींचे बॉक्स अमेरिकी प्रशासनाला भेट दिले जाण्याची शक्यता आहे.
मागच्या दोन वर्षांपासून देशात विवीध ठिकाणी पिकला जाणारा आंबा कोरोनामुळे परदेशात विकला गेला नव्हता. यामुळे यंदा आंब्यांची निर्यात परदेशात होणार असल्याने आंब्याला चांगला भाव मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान उत्तम दर्जाचा आंबा निर्यात होणार असल्याने आंबा उत्पादक शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे. दोन वर्षांपासून असलेली निर्यात बंदी उठवल्याचा फायदा होणार आहे.
दरम्यान इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या माहितीनुसार, हे आंबे पुण्यातील रेनबो इंटरनॅशनल या निर्यातदाराकडून निर्यात होणार आहेत. अमेरिकेतील व्हाईट हाऊसमध्ये महाराष्ट्रातील केसर, हापूस, गोवा मानकूर तसेच आंध्र प्रदेशातील हिमायत आणि बैगनपल्ली या पाच वाणांची खरेदी करण्यात आली आहे. असे रेनबो इंटरनॅशनलचे संचालक ए. सी. भासले यांनी इंडियन एक्सप्रेसला माहिती दिली.

### अमेरिकेत आंब्याची निर्यात पुन्हा सुरू

भासले म्हणाले, हा आंबा पॅक करून सोमवारी हवाई मालवाहतुकीने अमेरिकेला पाठवण्यात आला. सुमारे दोन वर्षांच्या अंतरानंतर, केंद्राने यासाठी युनायटेड स्टेट्स डिपार्टमेंट ऑफ ॲग्रीकल्चर ची मान्यता मिळविल्यानंतर या वर्षी अमेरिकेत आंब्याची निर्यात पुन्हा सुरू झाल्याचे ते म्हणाले.
कोरोनामुळे आंतरराष्ट्रीय प्रवासावर लादलेल्या निर्बंधांमुळे विकिरण सुविधांच्या तपासणीसाठी युएसडीए निरीक्षकांना भारतात भेट देता आली नव्हती. म्हणून 2020 मध्ये भारतीय आंब्याच्या निर्यातीवर अमेरिकेने निर्बंध घातले होते. दरम्यान हे निर्बंध हटवले आहेत यामुळे निर्यातदारांना चांगल्या व्यवसायाची आशा असल्याने, बहुतेकांनी व्यापाऱ्यांच्या माहितीनुसार, यावर्षी अमेरिकन बाजारपेठेत केसरऐवजी हापूसला जास्त मागणी आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# लावण्याचा गाभा : पं. शिवकुमार शर्मा

आधुनिक केसरी

मी अस्वच्छ राहिलो, कुरूप राहिलो तर त्यामुळे समोरची व्यक्ती प्रसन्न होणार नाही. तिच्या मनाला दुःख होईल. माझ्या मते कुरूपता म्हणजे हिंसा आणि सुंदरता ही अहिंसा ! आयुष्यभर अहिंसेचे पुजारी राहिलेल्या गांधीजींनी कुरूपता म्हणजे हिंसा आणि सौंदर्य म्हणजे अहिंसा अशी आगळीवेगळी हिंसा आणि अहिंसेची व्याख्या प्रथमच ऐकली असावी. नुसतेच सत्याचे उपासक असण्यापेक्षा ' सत्यम शिवम सुंदरम ' चे उपासक असणे कधीही चांगले हेच जणू रवींद्रनाथांना त्यांना सांगायचे होते. पं शिवकुमार शर्मा यांनीही आयुष्यभर ' सत्यम शिवम सुंदरम ' ची उपासना केली. ' शिव ' तर त्यांच्या नावात होतेच ! शिव आणि हरी ( हरिप्रसाद चौरासिया ) एकत्र आले तेव्हा अतिशय सुंदर सुमधुर चित्रपट संगीत प्रकटले. अनेक चित्रपटातून हा ' सिलसिला ' शास्त्रीय संगीताचे रूप घेऊन रसिकांपुढे आला आणि रसिकांना तो प्रचंड आवडला. आणि शिवकुमारजींच्या संतूरबद्दल तर काय बोलावं ! ज्याच्यातून शास्त्रीय संगीत निघणे शक्य नाही अशा संतूर या तंतुवाद्याला जागतिक स्तरावर त्यांनी शास्त्रीय संगीताचे अधिष्ठान प्राप्त करून दिले. संतूर हे वाद्य ' सुफियाना मौसिकी ' म्हणजे सुफी पंथात ईश्वराची साधना करण्यासाठी वापरले जायचे. त्यालाच ' शततंत्र वीणा ' असेही मूळ नाव होते त्याला पंडितजींनी जगभर प्रतिष्ठा मिळवून दिली. संगीताच्या रक्तात असलेल्या ईश्वरी देणगीला त्यांनी अखंड साधनेची जोड दिली. म्हणूनच हे यश ते मिळवू शकले. आपल्या यशाबद्दल बोलताना ते जे म्हणतात ते सगळ्यांनीच लक्षात ठेवण्यासारखे आहे. ते म्हणतात, " तुमच्या आयुष्यात सर्वाधिक महत्वाचे काय असेल, तर ते आहे अपयश. कारण त्यामुळेच तुमचा प्रवास यशाकडे सुरु होतो. " कोणतीही माणसे उगाचच मोठी होत नाही. अपयशाने निराश न होता, खचून न जाता आपली वाटचाल सुरु ठेवायची असते. आपले ध्येय कधीही दृष्टीआड होऊ द्यायचे नाही हेच पं शिवकुमारजी जणू आपल्याला सांगतात.



## आनंदी पहाट

## बचत आणि गुंतवणूक आवश्यक

आधुनिक केसरी

बचत आणि गुंतवणूक हा विषय गहन आहे, परंतू समजून उमजून हाताळला तर आपल्या पैशाची वृद्धी आणि आनंद द्विगुणीत करण्याची संधी आपल्याच नाही तर आपल्या पुढच्या पिढीसाठी देखील उपलब्ध होऊ शकते, फायदेशीर ठरू शकते. आपण आपल्या कुटुंबीयांचे आपल्याशी असलेले नाते जपण्याचा प्रयत्न करत असतो. या नात्यात प्रेमाचा ओलावा असल्यामुळेच आपल्या घरातल्या वातावरणात आपण गोडवा अनुभवत असतो. हे गहिरे नाते-संबंध खरे तर आपल्या प्रत्येक यशस्वी वाटचालीस कारणीभूत असतात. ह्याच कारणामुळे आपण आपल्या कुटुंबाची, आपल्या घराची विशेष काळजी घेत असतो. ह्याच दृष्टिकोनातून, आपल्या घरापासून आपण बचतीचे नवनवीन पर्याय निवडू शकतो. "पैसा हे साधन आहे, निश्चितच ते साध्य असू नये" हे जरी सत्य असले तरीही ते साधन साध्य करण्यासाठी विविध साधने कशाप्रकारे वापरावीत हे समजून घेणेही सद्यःस्थितीत तितकेच आवश्यक आहे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

पैशानीच पैसा मिळवला जातो, एका दृष्टिकोनातून ते अगदी खरेही आहे. एकूणच आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी आणि प्रत्येक अनुभव सुखद असण्यासाठी आवश्यकता असते, ती आपल्या पैशाच्या योग्य वापराची, बचतीची आणि गुंतवणुकीची. आपल्या बचतीची नवनवीन तंत्र वापरून त्याची प्रचीती आपल्याला येऊ शकते. आपल्या पैशाच्या बचतीसाठी विविध पर्यायांची आपण अभ्यासपूर्वक माहिती घेणे आपल्याच पैशाच्या वृद्धीसाठी उपयुक्त ठरू शकते. आपले जीवन सार्थ करणारे अर्थ मिळवण्याचा स्वार्थ असणे जरुरीचे आहे, अन्यथा सारे काही व्यर्थ ठरणार आहे. आपल्यापैकी नोकरी व्यवसाय करणाऱ्या तसेच न करणाऱ्या प्रत्येकाने आर्थिक व्यवहाराच्या महत्त्वपूर्ण बाबी समजूत घेतल्या पाहिजेत.



आधुनिक केसरी

**त्याला गवसला | कर्मयोग ||**

देव तुझा माझा | नसे कोणी दुजा ||
चैतन्याचा राजा | चराचरी ||१||

अनुभवी येतो | ज्याच्या त्याच्या ठायी ||
खूण परी नाही | गवसली ||२||

काळजाची ज्याच्या | वीट भाग्यवंत ||
उभा भगवंत | निरंतर ||३||

श्वासाची ही वारी | त्याची आराधना ||
चित्ती समाधाना | हेचि फळ ||४||

अंतरर्बाह्य एक | हरि ज्याचा झाला ||
त्याला गवसला | कर्मयोग ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी


**दुर्जनः परिहर्तव्यो विद्ययालङ्कृतोऽपि सन् ।**
**मणिना भूषितः सर्पः किमसौ न भयङ्करः ।।**

**अर्थ :** विद्येने अलंकृत असले, तरीही दुर्जनास जवळ ठेऊ नये. साप मण्याने आभूषित असला, म्हणून काय तो भयंकर नसतो का? या श्लोकात कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी दुर्जनसंगतीचा निषेध केला आहे. ज्याप्रमाणे मण्याने युक्त असलेला साप आपल्या मूळ विषारीपणाचा त्याग करीत नाही, त्या प्रमाणे विद्यावान जरी असला, तरीही दुर्जनाचा संग करू नये. दुर्जनसंगतीत मानहानिः पदे पदे। म्हणजे माणसाला पावलोपावली मानहानीस सामोरे जावे लागते.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



## मुमुक्षुलक्षण

आधुनिक केसरी


मित्रांनो, समर्थांनी हा समास 44 ओव्यांच्या मध्ये गुंफला आहे. आपण तर समाजात आजूबाजूला घडत असलेल्या घटना नेहमीच पहातो. पण अज्ञानाची झापड असल्याने स्वतः मध्ये सुधारणा करत नाहीत व समस्यांच्या खोल गर्तैत काही लोक बुडतातात. हे तर नको आहे, निकोप निष्कलंक समाज हवा आहे आणि या साठी तर आपली भारतीय संस्कृती परंपरा महत्वाची आहे. निकोप समाजरचनेसाठी भारतीय परंपरेचे अवलोकन, आचरण,वाचन,मनन,चिंतन परत,परत होणे गरजेचे आहे. आता आपण ओवी नुसार मुमुक्षु लक्षण समासाचा अभ्यास करू या. जो मनुष्य स्वैर विचाराचा आहे. पण जेव्हा त्याच्यावर सांसारिक आपत्ती येते तेव्हा तो जागा होतो. त्याला पश्चाताप होतो संसाराची आसक्ति सुटते. पुढे कधीतरी त्याला सत्पुरुषाचा ऊपदेश पटतो . जे कर्म करत होता ते वाईट आहे हे त्यालाच पटते."संसाराचा सोस आता.बास झाला" असे त्याला वापते. आता उरलेला काळ तरी सार्थकी लावावा असे त्याला वाटते. बद्धाला पश्चाताप झाला म्हणजे त्यांच्या मनाची कशी अवस्था होते याचे वास्तव वर्णन समर्थ करतात. पूर्वी त्याच्या हातून पापे घडली आहेत. अनेक यमयातना आठवतात मनाला भय वाटते आता त्याला वाटते की "याच्या आधी आयुष्यात पुण्याचा कधी विचारचं केला नाही अनेक पापांचे डोंगर मात्र रचले. संसाराचा मोहपाशात गुरफटून गेलो . आपण स्वतः चे दोष झांकले. व चांगल्या माणसांना त्यांच्याकडे नसलेले दोष चिकटवले,साधू संत ,सज्जन यांची विनाकारण निंदा केली. आपल्या अवगुणांचा त्याला पश्चाताप होतो. संतांना ओळखले नाही भगवंताचे पूजन कधी केले नाही घरी आलेल्या अतिथी अभ्यागताची कधी साधी विचारपूस केली नाही. **(क्रमशः)**



सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# सत्समागम म्हणजे संत सांगतील त्याप्रमाणे वागणे

कोणत्याही मंगल कार्यात सर्वाआधी गणपतीचे आवाहन करतात, आणि सगळे कार्य संपले की सर्वांचे शेवटी त्याचे विसर्जन करतात. त्याचप्रमाणे अनुसंधानानेच पोथीला सुरुवात करावी आणि अनुसंधानानेच पोथीची समाप्ती करावी. लौकिक कार्यामध्ये गणपतीचे विसर्जन झाल्यावर आपण शिल्लक उरतो, पण अनुसंधानाचे विसर्जन करताना आपणही त्यात नाहीसे व्हावे. "जसे ठेवायचे असेल तसे ठेवा, पण आपला विसर पडू देऊ नका, एवढी भीक घालावी, " अशी गुरूच्या चरणी प्रार्थना करावी. भगवंताला विसरून भजन करू नका. भगवंताची आठवण ठेवून भाजी जरी आणली तरी त्याचे श्रेय जास्त आहे. जगाच्या लाजेला भिऊन भगवंताला अंतर देऊ नये. 'मी कोण' याचा विचार करावा, आणि तो करण्यासाठी, 'मी नाही कोणाचा' हे बघावे. मी आप्तेष्टांचा, बायको-मुलांचा, आईबापांचा तर नाहीच, पण मी देहाचा आणि मनाचाही नाही; असे करता करता जो राहील तो मी. खरे समाधान एकपणात आहे, अद्वैतात आहे. म्हणून, द्वैताचा जनक जो अभिमान तो कमी कसा होईल ते बघावे. याकरिता, मी कर्ता नसून देव कर्ता आहे असे मानावे. सर्वांभूती भगवद्भाव पाहावा, सत्समागम करावा.



सत्समागम म्हणजे सत्याचा समागम. सत्पुरुषाच्या वचनावर विश्वास ठेवून त्याप्रमाणे वृत्ती बनविणे हा खरा सत्समागम आहे. संतांवर अनन्य श्रद्धा ठेवा. त्यांच्या चालीने चाला. त्यांच्या समागमात दैन्य मानू नका, जे तुमची एकसारखी विषयातली नडच भागवतील ते संत नव्हेत. खरे संत विषयाची आसक्ति कमी करतात; अशा संताला शरण जावे. निर्विषय चित्त संतांनाच करता येते. संत हे ईश्वरदर्शनाची तळमळ उत्पन्न करतात. तळमळ उत्पन्न करून देणे हीच संतांची कामगिरी. संतांची भाषा तळमळीची असते, म्हणून ती तळमळ उत्पन्न करते. संत सांगतील त्याप्रमाणे वागावे. जग संतांशिवाय असणेच शक्य नाही. जे देहात दिसले पण वस्तुतः देहातीत राहिले ते संतच होत. आम्हाला त्यांना ओळखता येत नाही याला काय करावे ? नामाच्या योगानेच संत ओळखता येतात आणि टिकवता येतात. जो भगवंताचे नाम घेईल त्याला संत भेटेल, आणि तो त्याला भगवंताची प्राप्ती करून देईल. त्याचे कुठे अडणार नाही. पण जो नुसत्या शब्दज्ञानाच्या मागे लागेल त्याला आसक्ति सुटणार नाही, आणि त्याचे जीवन सार्थकी लागणार नाही.

**आजचे बोधवचन :** संताच्या पदरात पडले की तो आपली लाज राखतो.

**-श्रीसद्गुरू ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# जनतेच्या हितासाठी केंद्र सरकारला जाब विचारू : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशातील सध्याची परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. रुपयाची दररोज घसरण होत आहे,महागाई व बेरोजगारी प्रचंड वाढलेली आहे. जनतेच्या जीवन मरणाचे प्रश्न असताना धार्मिक मुद्द्यांना पुढे करून वातावरण बिघडवायचे व मुख्य प्रश्नांवरून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्याचे एक मोठे षडयंत्र भाजपकडून सुरु आहे परंतु काँग्रेस जनतेच्या हितासाठी केंद्र सरकारला जाब विचारत राहिल, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी स्पष्ट केले आहे.



प्रसार माध्यमांशी संवाद साधताना नाना पटोले म्हणाले की, केंद्रातील मोदी सरकार हे सर्व आघाड्यांवर कुचकामी ठरले आहे. महागाई, शेतकरी, कामगार, गरिबांचे केंद्र सरकार प्रश्न सोडवू शकले नाही. काँग्रेस पक्षाला आजच्या परिस्थितीची चिंता वाटते म्हणून जनतेला न्याय कसा मिळेल यासाठी आमची लढाई सुरु आहे. केंद्र सरकारने जनतेला दिलासा देण्याचे निर्णय घेतले पाहिजेत माक्ष त्याकडे दुर्लक्ष करून धार्मिक मुद्दे पुढे केले जात आहेत. हिंदू धर्माबद्दल आम्हाला दुसऱ्यांकडून शिकण्याची गरज नाही, माणुसकी हा खरा धर्म असून ती जोपासली पाहिजे. जनतेचे प्रश्नच सोडवणार नसले तर ते सरकार काय कामाचे. काँग्रेस पक्षाने सातत्याने जनतेचे प्रश्न घेऊन रस्त्यावर संघर्ष केला आहे. आजही आम्ही जनतेच्या प्रश्नासाठी केंद्र सरकारविरोधात उभे आहोत. महागाईप्रश्नी विरोधी पक्ष राज्य सरकारकडे बोट करत आहेत हे साफ चुकीचे आहे, याप्रश्नी विरोधकांचे आरोप बिनबुडाचे आहेत. महाविकास आघाडी सरकारने अडीच वर्षात कोणतीही करवाढ केलेली नाही. जीएसटीमुळे राज्याच्या हातात काही राहिलेले नाही आणि केंद्र सरकारने महाराष्ट्राचे करोडो रुपये थकवलेले आहेत. देशाच्या तिजोरात सर्वात जास्त पैसा मुंबई, महाराष्ट्रातून जातो पण केंद्र सरकार महाराष्ट्राला निधी देताना मात्र हात आखडता घेते, हा महाराष्ट्रावर अन्याय आहे. केंद्र सरकारनेच इंधनावरील करातून २६ लाख कोटी रुपये कमावले आहेत आणि राज्य सरकारने कर कमी करावेत अशी अपेक्षा केंद्र सरकार व भाजपा करत आहे हे अत्यंत चुकीचे आहे, असेही प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

## औरंगाबाद कृषी उत्पन्न बाजार समितीला कोल्ड स्टोरेजसाठी निधी देऊ : फलोत्पादन मंत्री भुमरे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासकीय संचालक मंडळ अतिशय चांगले कामकाज करीत आहे. पाचोड येथील कोल्ड स्टोरेजच्या धर्तीवर औरंगाबाद कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी येत्या वर्षात निधी मंजूर करण्यात येईल, अशी ग्वाही फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे यांनी दिली.

उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती, औरंगाबाद व महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सालाबाद प्रमाणे औरंगाबाद शहरातील नागरिकांच्या आग्रहास्तव उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजनेंतर्गत 20 ते 23 मे 2022 या कालावधीत मुख्य बाजार आवार, जाधववाडी, औरंगाबाद येथे आयोजित आंबा महोत्सावाचे उद्‍घाटन रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भूमरे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. उद्‍घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे आमदार अंबादास दानवे, कल्याण काळे, कैलास पाटील, जिल्हाधिकारी सुनील चव्हाण, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी टी.एस. मोटे, जिल्हा उपनिबंधक अनिलकुमार दाबशेडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे मुख्य प्रशासक जगन्नाथ काळे, मुरलीधर चौधरी, शिवाजी गावंडे, कृष्णा उकिर्डे, शिवाजी ढाकणे, शेख मोहंमद शेख चाँद, प्रकाश जाधव, गणेश नवले, अशोक शिंदे, मो. अबु सुफियान मो. गयास बागवान व कृषी पणन मंडळ, औरंगाबाद उपसरव्यवस्थापक जी.सी. वाघ तसेच बाजार समितीचे सचिव व्ही. ए. शिरसाठ, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मंत्री भूमरे यांनी शेतकऱ्यांनी लावलेल्या स्टॉलला भेट दिली. प्रथम बाजार समितीचे प्रशासक कै. उदयराज पवार यांचे पंधरा दिवसांपूर्वी अल्पशा आजाराने निधन झाल्याने त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तद्‍नंतर बाजार समितीचे मुख्य प्रशासक यांच्यावतीने आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे आंबा उत्पादक शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी चव्हाण यांनी बाजार समितीने आयोजित केलेल्या आंबा महोत्सवाची स्तुती केली. समितीचे धर्तीवर कोकणामधील हापूस व मराठवाड्यातील केसर आंबा शहरातील शेवटच्या नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी जाहिरात प्रचार-प्रसिद्धी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत केल्या जाईल, असे आश्‍वासन देऊन शेतकऱ्यांना फळबागेविषयी सविस्तर मागदर्शन केले.

बाजार समितीचे मुख्य प्रशासक काळे यांनी प्रास्ताविक केले. बाजार समितीने उपबाजार आवारासाठी करोडी येथे 20 एकर जमीन संपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविलेला आहे. त्यामुध्ये जिल्हाधिकारी यांनी सहाकार्य करावे, अशी मागणी श्री.काळे यांनी केली. आभार बाजार समितीचे अशोक शिंदे यांनी मानले.

## आत्मनिर्भर भारतासाठी वैद्यकीय क्षेत्राची भूमिका महत्त्वाची : संरक्षणमंत्री राजनाथ सिंह

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** डॉ. डी. वाय पाटील विद्यापीठाचा तेरावा पदवीप्रदान समारंभ देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी २० रोजी संपन्न झाला. यावेळी बोलत होते. ते म्हणाले की, 'स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने आत्मनिर्भर होण्याचा संकल्प केला आहे. आपल्या गरजांसाठी दुसऱ्या देशांवर भारत आता अवलंबून राहू इच्छित नाही. त्यासाठी 'व्होकल फॉर लोकल'ची हाक पंतप्रधानांनी दिली आहे. स्वदेशीची पहिली हाक याच पुण्यातून लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांनी दिली होती. विद्यार्थ्यांनी व्यवसाय-उद्योगात नव्या संकल्पना आणण्यावर भर द्यावा सरकार त्यांच्या पाठीशी आहे', असे देशाचे संरक्षणमंत्री राजनाथसिंह यावेळी म्हणाले.

या समारंभात ज्येष्ठ उद्योगपती व फोर्स मोटर्सचे अध्यक्ष डॉ. अभय फिरोदिया आणि सकाळ मीडिया ग्रुपचे अध्यक्ष पद्मश्री प्रतापराव पवार यांचा राजनाथसिंह यांच्या हस्ते डीपीयूच्या मानद पदवी, डॉक्टर ऑफ लेटर्स (डी.लिट)ने गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. डी. वाय पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, प्र-कुलपती डॉ. भाग्यश्री पाटील, कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, सचिव डॉ. सोमनाथ पाटील, विश्‍वस्त व संचालिका डॉ. स्मिता जाधव, विश्‍वस्त व कोषाध्यक्ष डॉ. यशराज पाटील आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी राजनाथसिंह म्हणाले की, करोना आपत्तीनंतर आरोग्य क्षेत्राचे महत्त्व आणि या क्षेत्राबद्दलचा जगभरातील आदर वाढला आहे. आरोग्य, निरोगीपणा याला आपल्या संस्कृतीत प्राधान्य देण्यात आले आहे.

## राहुल टाक यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी कोच म्हणून नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** कर्नाटक येथील बेल्लारी येथे २० ते २६ मे दरम्यान राष्ट्रीय बॉक्सिंग महासंघाच्या वतीने मुलांच्या सब-ज्युनिअर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्राकडून कोच म्हणून औरंगाबादच्या राहुल टाक यांची नियुक्ती करण्यात आली. राहुल याने यापूर्वी अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धेत कोच म्हणून काम पाहिले आहे.

त्यांच्या नियुक्तीबद्दल राज्य संघटनेचे उपाध्यक्ष मा. आ. श्रीकांत जोशी, शहर संघटनेचे उपाध्यक्ष एकनाथ जाधव, सचिव पंकज भारसाखळे, कोषाध्यक्ष आरोह बर्वे, नीरज भारसाखळे, डॉ. प्रदीप खंद्रे, सतीश भट्ट आदींनी अभिनंदन केले.

## वर्ध्यात जादूटोण्याच्या नावाखाली गळा आवळून खून, पोलिसांकडून तिघांना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** तांत्रिक विद्येचा कथित उपयोग करीत बळी घेतल्याची खळबळजनक घटना वर्धा जिल्ह्यात उघडकीस आली आहे. पोलिसांनी या प्रकरणी आरोपींना ताब्यात घेतले आहे. अब्दुल रहीम अब्दुल मजीद, अब्दुल जुनाईद, अब्दुल जमीर अब्दुल रहीम अशी या प्रकरणातील आरोपींची नावं आहेत. त्यांच्या विरोधात महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष अनिष्ट, अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आर्वी येथील विठ्ठलवार्ड परिसरात हा अघोरी प्रकार १८ मे रोजी घडला. यानंतर १९ मे रोजी रात्री गणेश तुकाराम सोनकुसरे यांनी तक्रार दाखल केली. गणेश सोनकुसरे (रा. बेलपुरा, अमरावती) यांनी त्यांच्या मोठ्या मुलाला उपचारासाठी वरील तीन आरोपीकडे नेले होते. त्यांनी तांत्रिक उपचार केले. शेवटी संगनमत करीत गळा आवळून ठार केले. याबाबत पोलिसांना माहिती न देता मृतदेह फिर्यादीच्या हवाली केला. त्याची तक्रार कोतवाली अमरावती पोलीस ठाण्यात दाखल झाली. त्यानुसार आर्वी पोलिसांनी कारवाई केली आहे.

**मांत्रिकांची सखोल चौकशी करणे आवश्यक**

अखील भारतीय अंनिसचे राज्य संघटक पंकज वंजारे म्हणाले, या घटनेतील बाबा, मांत्रिकांची सखोल चौकशी करणे आवश्यक आहे. चौकशीत आणखी धक्कादायक माहिती पुढे येऊ शकते.

यात अंनिसचे संपूर्ण सहकार्य असेल. भविष्यातील अंधश्रध्दांचे बळी थांबतील. आर्वी उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील सोळुंके म्हणाले, तिन्ही आरोपींना न्यायालयात हजर करण्यासाठी नेण्यात आले आहे. पीएम रिपोर्टमध्ये गळा आवळल्याच्या खुणा दिसून येत आहेत. हे गंभीर प्रकरण असून कसोशीने चौकशी होत आहे.









## युद्धावर महागाईचे खापर

आधुनिक केसरी

स्वयंपाकाच्या गॅसच्या दरात काल पुन्हा वाढ झाली. १४.२ किलोच्या गॅस सिलिंडरचा दर केव्हाच हजारावर जाऊन पोहोचला आहे. इंधनाचे दर तर सतत वाढत आहेत. परिणामी अन्नधान्यापासून इंधनापर्यंत सर्व क्षेत्रांमध्ये महागाईचे चटके गेले तीन महिने जनतेला बसत राहिले आहेत. रशिया – युक्रेन युद्धावर या महागाईचे खापर फोडून सरकार नामानिराळे होऊ पाहात असले तरी प्रत्यक्षात हे युद्ध सुरू होण्याआधीपासूनच देशातील महागाईचा निर्देशांक रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या चार टक्क्यांच्या मर्यादेच्या वर राहिला आहे. स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरच्या दरात मार्चमध्ये पन्नास रुपयांची वाढ केली गेली होती. मेच्या पहिल्या आठवड्यात तो पुन्हा पन्नास रुपयांनी वाढवला गेला. काल त्यात साडे तीन रुपयांची वाढ केली गेली. ही काही शेवटची वाढ नव्हे. अशी दरवाढ सातत्याने होत राहणार आहे. इंधनाचे दरही निवडणुका आटोपताच एकदम न वाढवता दर दिवशी ऐंशी पैशांनी वाढवण्याची धूर्त नीती सरकारी तेल कंपन्यांनी अवलंबली. पेट्रोल डिझेलचे दर उतरण्याची शक्यता तर नाहीच, उलट वाढण्याचीच चिन्हे आहेत. वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य जनतेची क्रयशक्ती आक्रसत चालली आहे. त्याचा परिणाम म्हणून गुंतवणूक आणि बचतीमध्येही घट होईल. त्यामुळे आंतरराष्ट्रीय वित्तीय मानांकन संस्थांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकास दराची घसरण अपेक्षिली आहे. संयुक्त राष्ट्रांनीही भारताचा विकास दर केवळ ६.४ टक्क्यांवर राहील असा अंदाज काल व्यक्त केला आहे. शेअर बाजार सातत्याने कोसळत आहे. बाजारपेठेत मंदीचे वातावरण आहे. सद्यस्थितीत वित्तीय गुंतवणूक करणे नुकसानीचे ठरू लागले आहे.
सर्वसामान्य जनतेच्या रोजच्या जगण्याचा संघर्ष दिवसेंदिवस अधिकाधिक खडतर होत चाललेला आहे याचे भान नेत्यांना आहे की नाही? विरोधी पक्षही गलितगात्र होऊन चिडीचूप बसले आहेत. एकीकडे महागाई रोज सामान्य जनतेचे कंबरडे मोडत असताना वर्तमानातील वास्तवाकडे जनतेचे दुर्लक्ष व्हावे यासाठी तिला इतिहासातील भलत्या विवादांमध्ये गुंतवले जात आहे की काय असे वाटावे अशा तऱ्हेच्या घटना देशात सध्या चौफेर घडत आहेत. इतिहास महत्त्वाचा आहेच, परंतु तुमच्या आमच्या रोजच्या जगण्याशी जोडले गेलेले वर्तमान अधिक महत्त्वाचे आहे !

## ...तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील



भूमिपुत्र वाघ
संपर्क क्र. 9172972482

आधुनिक केसरी

**गाव ते तालुका इथपर्यंत प्रत्येक ठिकाणी लोकसंख्येच्या पटीत लोकांची गरज ओळखून अंदाज करून जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतींना काही विशिष्ट रक्कम स्टॉल बांधकामासाठी जर उभा केली तर प्रत्येक गावांमध्ये शेतीमालाची विक्री करणारे स्टॉल लावले जातील. त्या स्टॉलच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सध्या जो भाव मिळतो, त्याच्यापेक्षा किमान दुप्पट भाव मिळेल. आणि शेतकरी सुखावला जाईल. यासाठी सरकारने स्वतंत्र स्टॉल बांधकाम निधीची सोय करावी. आणि चांगल्या दर्जाचे स्टॉल निर्माण करावेत.**

भारतामध्ये कष्टकरी कामगार शेतकरी याला कधीच केव्हाच न्याय मिळाल्याचे दिसून आलं नाही. कधी वाचलं नाही!!!! कधी पाहिलही नाही!!!! कधी आणूभवलही नाही. वामनाने बळीराजाचा घात केला तेव्हापासून तर आजपर्यंत रोज बळीराजाचा बळी घेतला जातो.!!!! तो बांधावर दिसतो, झाडाच्या फांदीवर दिसतो!!! तो खत बीयानाच्या दुकानात दिसतो!!! तो बँकेच्या आणि सावकाराच्या दारात दिसतो!!! अंगावरच्या जीर्ण झालेल्या कळकटून गेलेल्या कपड्यात दिसतो!!!!..
रोज तेच तेच पाहतो.. पाहणाऱ्यांच्याही संवेदना बोथट झालेल्या असतात.!!!! त्यामुळे कर्जात बुडालेल्या शेतकऱ्यांच्या वेदना कोणालाच काही वाटत नाहीत. त्याची तीव्रता जळून गेलेल्या कोळशाच्या राखे सारखी होते. आणि जांच्याकडे पाहण्याची जबाबदारी लोकशाहीने टाकलेली आसते त्यांच्या डोळ्यावर झापडा आलेल्या दीसतात. मताची ओंजळ भरण्यापुरतीच प्रश्नाला तीव्रता येते, धार येते. भाषणाचे आणि भोंग्याचे आवाज गगनाला भिडतात. आणि मग मतदान झालेल्या दिवशी ते सारे प्रश्न लुप्त होतात. निवडणून आल्यानंतर मिरवणुकीमध्ये दारूच्या नशेत पैशाची उधळण करताना त्याच दिवशी त्याच प्रश्नाची उघडी धिंड काढली जाते.
मतदानाच्या आदुगर भाषण करणारे लोक निवडणूक झाल्यानंतर राक्षसापेक्षाही बेकार दिसायला लागतात. धुंदीमध्ये शेतकऱ्यांचे प्रश्न, कामगारांचे प्रश्न, शेतीमालाचा भाव सगळं त्याच रॅलीमध्ये विरून जातं.जी जी आश्वासने दिली होती ती खुर्चीत जाऊन बसले की सगळंच कसं वांझोट दिसायला लागतं.
मित्रांनो शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांचा सन्मान व्हायला पाहिजे. रास्त भाव ठरला पाहिजे. यासाठी थोरामोठ्यांनी आंदोलने केली. हजारो शेतकऱ्यांनी स्वतःचे प्राण पणाला लावले. गोळ्या झेलाव्या लागल्या. आत्महत्या कराव्या लागल्या. परंतु जे सत्तेमध्ये जातात त्यांनी कधीच ह्या प्रश्नाला न्याय दिलेला दिसून येत नाही. तुम्हा



सर्वांचे याकडे लक्ष वेधण्याचा मी प्रयत्न करत आहे.
१. गाव तिथे शेती माल विक्रीचे स्टॉल निर्माण करा
2. आठवडी बाजारामध्ये शेतकऱ्यांसाठी शेती माल विक्रीचे स्टॉल निर्माण करा.
3. तालुक्याच्या ठिकाणी शेतकऱ्यांचे स्वतंत्र स्टॉल निर्माण करा. गाव ते तालुका इथपर्यंत प्रत्येक ठिकाणी लोकसंख्येच्या पटीत लोकांची गरज ओळखून अंदाज करून जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतींना काही विशिष्ट रक्कम स्टॉल बांधकामासाठी जर उभा केली तर प्रत्येक गावांमध्ये शेतीमालाची विक्री करणारे स्टॉल लावले जातील. त्या स्टॉलच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सध्या जो भाव मिळतो, त्याच्यापेक्षा किमान दुप्पट भाव मिळेल. आणि शेतकरी सुखावला जाईल. यासाठी सरकारने स्वतंत्र स्टॉल बांधकाम निधीची सोय करावी. आणि चांगल्या दर्जाचे स्टॉल निर्माण करावेत. ऊन, वादळ,पावसापासून या मालाचे संरक्षण होईल. अशा दर्जाचे बांधकाम तयार करावे. रोज सकाळी सात ते दहा आणि सायंकाळी सहा ते नऊ या वेळेमध्ये गरजेनुसार लोक तयार झालेला शेतीमाल गावातल्या स्टॉलमध्ये विकतील. गावातल्या लोकांच्या अडचणी सुटतील आणि शेतकऱ्याला चांगला भाव मिळेल. हीच पद्धत आठवडी बाजारामध्ये आणि तालुक्याचे ठिकाणी निर्माण करावी. जेणेकरून शेतकऱ्याला त्याचा स्वतःचा माल विकता येईल. आणि चार रुपये जास्त मिळतील.
शेतकऱ्याची फसवणूक कुठे होते.
शेतकरी भाजीपाला असेल अन्नधान्य असेल तो पहाटे 4 वाजता आडतीवर आणतो. अडते लोक, व्यापारी लोक त्यांना हवं त्या भावात शेती माल विकत घेतात. शेतकऱ्याला नाही परवडलं नाही तरी त्याला परत नेता येत नाही. त्याची कुचंबणा होते. आणि आहे त्याच स्थितीमध्ये त्याला विलाज नाविलाजाणे विकून परत जावं लागतं.

**1) आडते आणि व्यापारी करतात काय?**

शेतकऱ्यांचा ज्या भावात माल घेतात, त्या घेतलेल्या भावाच्या तिप्पट रक्कम लावून ते बाजारामध्ये विक्री करतात. ग्राहकांना तिप्पट भाव परवडत नाही. त्यांचाही नाविलाज होतो. महागाई यातून वाढलेली दिसते आणि दुसऱ्या बाजूला ज्यांनी पिकवीलं, कष्ट केलं, खर्च केला, उच्च प्रतीचं बी-बियाणं वापरलं, श्रम केलं, विजेच्या लपंडावासोबत रात्रीचा दिवस केला. त्या कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला त्याच्या केलेल्या कष्टाची मजुरीही मिळत नाही. आणि मग निराश झालेला शेतकरी शांतपणे आपलं आयुष्य समाप्त करतो.

**2. शेतीमालाचे रास्त भाव ठरवा**

जो शेतामध्ये माल पिकतो त्याचे दोन भाग करावेत. एक उच्च दर्जाचे उत्पन्न आणि कनिष्ठ दर्जाचे उत्पन्न त्याचे फिक्स भाव करून सरकारनी विकत घ्यावे.किंवा आडत्यांनी खरेदी करावेत. असे दोन प्रकारचे प्रत्येक अन्नधान्याचे भाव ठरवल्यास शेतकऱ्यांना ते परवडेल. आणि ग्राहकांना सुद्धा परवडेल. जे व्यापारी शेतीमाल विकत घेतात. ते साठवणूक करतात. नंतर विक्रीसाठी बाजारात उपलब्ध करतात. त्यावेळेला सुद्धा खरेदीच्या पाच ते दहा टक्के फरक करून विक्रीचा भाव सुद्धा निश्चित केला पाहिजे. म्हणजे शेतकरी, व्यापारी, आणि ग्राहक समाधानानी जगतील. या दोनच गोष्टी सरकारने कराव्यात त्याचं रूपांतर कायद्यात करावं. तर या देशातल्या शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बदलेल. शेतकरी व्यापारी आणि ग्राहक सुखाने जीवन जगतील असे वाटते.

## आदतसे मजबूर...



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

**परदेशात म्हणे खूप स्वच्छता असते. कोणी कागदाचा कपटा सुद्धा रस्त्यावर टाकत नाही. मग थुंकणे तर दूरची गोष्ट ! पण जगातील सगळ्यात मोठी लोकशाही असलेल्या आपल्या देशात केवढे हे स्वातंत्र्य..! आम्ही कधी शहाणे होणार? शिकलेल्यांची आणि न शिकलेल्यांची परिस्थिती सारखीच. आणि आता तर करोनासारख्या घातक विषाणूने जगभर थैमान घातले आहे. रोज करोनाबाधितांची संख्या वाढते आहे. करोनाचे विषाणू रोग्याच्या थुंकीमार्फत वातावरणात पसरतात. ते तुमच्या आमच्या श्वासात हवेतून गेले की आपल्यालाही त्यांचा संसर्ग होऊ शकतो. म्हणून आता बदलायला हवे.**

आमच्या घराच्या समोरून थोडे अंतर चालले की आपण मुख्य रस्त्यावर येतो. त्या रस्त्यावरच्या एका कोपऱ्यात एक पानाचा ठेला किंवा पानटपरी आहे. मी लहानपणापासून तिथे गर्दी पाहत होतो. सुरुवातीला माझ्याकडे कोणतेच वाहन नव्हते. साधी सायकलही नव्हती. पायी फिरायला आवडायचे. त्यामुळे वाहन नाही म्हणून तक्रार नव्हती. पण नकळत कधी तरी त्यांचे आकर्षण वाटायचे. मी ज्या पान टपरीचा उल्लेख करतो आहे, त्या ठिकाणी बरेच गाडीवाले थांबायचे. कोणी टू व्हीलरवाले तर कोणी फोर व्हीलरवाले. लहानपणी गाडीबद्दल असणाऱ्या नैसर्गिक कुतूहलातून मी त्यांचे निरीक्षण करायचो.
एखादा टू व्हीलरवाला आपल्या गाडीवरून रुबाबात खाली उतरायचा. त्या पानवाल्याला एकशे वीस किमाम असले काही तरी सांगायचा. तो पानवाला आपल्या ग्राहकांच्या सेवेत अत्यंत तत्पर होता. त्याने प्लॅस्टिकच्या आवरणात अगोदरच काही पुड्या रबर लावून बांधून ठेवलेल्या असायच्या. त्याच्यात आणि त्याच्या ग्राहकांत फार सामंजस्याचे वातावरण होते. कारण त्यांच्यात फारसे संभाषण होत नसायचे. नेहमीच्या परिचयाने दोघे एकमेकाला चांगले ओळखत असत. ग्राहकाने खिशातून नोट काढायची, पानवाल्याला द्यायची. तो ते आधीच बांधून ठेवलेले पुडके लागलीच द्यायचा. सोबत उरलेले सुटे पैसे.
कधी कधी काही ग्राहक दिवसभराची सोय करून ठेवावी म्हणून जास्तीच्या दोनचार पुड्या आपल्या खिशात ठेवायचे. इतकी समंजस माणसे पाहून मला आपला देश सुधारू लागला असे उगीच वाटायचे. मग त्या पानवाल्याचे ते आदरणीय ग्राहक किंवा तो ग्राहकराजा आपल्या गाडीवर आरूढ होण्यापूर्वी ती दिलेली पुडी व्यवस्थित सोडून आपल्या तोंडात रिकामी करायचा. मग त्याच्या तोंडात एका बाजूला छानपैकी फुगा यायचा. चेहेऱ्यावर समाधानाचे, तृप्ततेचे भाव यायचे. त्या तृप्त अवस्थेत आपला मुखरस तोंडात साठवत, तो आपल्या गाडीला किक मारायचा. मग ती गाडीसुद्धा समाधानाने मार्गस्थ व्हायची. एखादी फोरव्हीलर थांबायची. तिचा चालकही गायछाप किंवा तसलेच काही तरी घ्यायचा. हातावर घेऊन त्यावर बोटाने किंवा बोटाच्या नखाने घेतलेला चुना मळत ते मिश्रण पुरेसे एकजीव झाले की बोटाच्या चिमटीत ती पूड घेऊन अत्यंत पद्धतशीरपणे आपल्या तोंडात एका बाजूला व्यवस्थित ठेवायचा. केवढी ही शिस्त..! मग गाडीत बसायचा, आणि ती फोरव्हीलर कोणतीही तक्रार न करता सुरु व्हायची. आणि ते समाधानी जीव मार्गस्थ व्हायचे. (सध्या गुटखा खाण्यावर बंदी असली तरी गावोगावचे पानवाले आपल्या ग्राहकांची गैरसोय होऊ नये म्हणून चोरूनलपून का होईना पण त्यांची ही हौस पुरवतात हा भाग वेगळा.)




खूप दिवस माझा असा समज झाला होता की तोंडामध्ये बार असल्याशिवाय किंवा एका बाजूला गाल फुगलेला असल्याशिवाय कोणतेही वाहन सुरु होत नाही. ते वाहन नीट चालायचे असेल तर तुमच्या तोंडामध्ये बार हा असलाच पाहिजे. त्या पानटपरी जवळची भिंत लाल पिवळ्या तपकिरी रंगात रंगलेली होती. त्या पान टपरीवाल्याच्या उदार ग्राहकांनी त्याला त्या भिंत रंगवण्याचा कोणताही खर्च येऊ नये या उदात्त हेतूने आपल्या पाझरलेल्या मुखरसाने ती आधीच रंगवून ठेवली होती. पुढे मी जसजसा मोठा होत गेलो, तसतसे मला कळू लागले की कुठेही आपल्या मुखरसाची बरसात करायची नाही. त्यासाठी एखादा कोपरा शोधायचा आणि मगच ते सत्कृत्य करायचे. या चांगल्या सवयीमुळे सरकारी कार्यालये, वाचनालय इतकेच काय पण शाळांचे कोपरे, सार्वजनिक स्वच्छतालये आदींचे चे कोपरे लोकांनी रंगवलेले होते. इतरत्र कुठेही त्यांनी आपल्या मुखरसाची बरसात केली नव्हती.
पण काही हुशार लोकांनी इमारतींच्या कोपऱ्यात देवाच्या चित्रांच्या टाईल्स बसवून अशा लोकांची फार पंचाईत केली होती. आणि त्या बिचाऱ्यांना कुठे बोलताही येत नव्हते. सगळा तोंड दाबून बुक्क्याचा मार. त्यांना काही पर्याय द्यायला नको का? बरं सगळीकडे लिहून ठेवलंय 'येथे थुंकू नका. 'पण मग थुंकायचे तरी कुठे? आणि आता तर काय म्हणे मायबाप सरकारने त्याच्यावर दंडच लावलाय. काय करायचं बिचाऱ्यांनी ! परदेशात म्हणे खूप स्वच्छता असते. कोणी कागदाचा कपटा सुद्धा रस्त्यावर टाकत नाही. मग थुंकणे तर दूरची गोष्ट ! पण जगातील सगळ्यात मोठीलोकशाही असलेल्या आपल्या देशात केवढे हे स्वातंत्र्य..!
आम्ही कधी शहाणे होणार? शिकलेल्यांची आणि न शिकलेल्यांची परिस्थिती सारखीच. आणि आता तर करोनासारख्या घातक विषाणूने जगभर थैमान घातले आहे. रोज करोनाबाधितांची संख्या वाढते आहे. करोनाचे विषाणू रोग्याच्या थुंकीमार्फत वातावरणात पसरतात. ते तुमच्या आमच्या श्वासात हवेतून गेले की आपल्यालाही त्यांचा संसर्ग होऊ शकतो. म्हणून आता बदलायला हवे. कोणत्याही बदलाची सुरुवात ही स्वतःपासून होत असते. आपले वैयक्तिक आणि सार्वजनिक आरोग्य सांभाळायचे तर स्वच्छतेला आणि चांगल्या सवयींना पर्याय नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

पुस्तक परीक्षण

# भगवान बुद्ध यांची आध्यात्मिक शिकवण



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आधुनिक केसरी


**"भगवान बुद्ध यांची आध्यात्मिक शिकवण" ह्या शीर्षकाखाली विद्यावाचस्पती विद्यानंद ह्यांनी लिहिलेल्या पुस्तकात अनेक विषयांना संदर्भासहित स्पर्श केला असून त्यांचा स्वतःचा आध्यात्मातील अभ्यास आणि त्यांतील त्यांचे स्थान स्पष्ट होते. मुळातच विद्यावाचस्पती विद्यानंद ह्यांचा गेल्या २० वर्षांचा आध्यात्मामधील प्रदीर्घ अनुभव, प्रत्यक्ष लेखन, शिक्षण क्षेत्रातील ३५ वर्षांचे मोठे योगदान, विविध २८ विद्याशाखांचा गाढा अभ्यास आणि सखोल शिक्षण, लेखनातील अचूकता, विषय आणि आशयाची नेमकेपणाने केलेली मांडणी ह्या सर्वच बाबींमुळे आजवर दुर्लक्षित राहिलेला विषय आणि पुस्तकातील आशय ह्यांचे महत्व वाढेल अशी खात्री वाटते. पुस्तकाचे मुखपृष्ठ, रचना, आतील पानांची मांडणी, एकूणच सजावट तसेच छपाई अतिशय विलोभनीय झाली आहे. मर्यादित पृष्ठसंख्येत सचित्र मजुकर असल्यामुळे पुस्तक अधिकच आकर्षक झाले आहे.**

बौद्ध धर्म ही एक आध्यात्मिक परंपरा आहे, जी वैयक्तिक आध्यात्मिक विकासावर आणि जीवनाच्या खऱ्या स्वरूपाची खोल अंतर्दृष्टी प्राप्त करण्यावर लक्ष केंद्रित करते. ती लोकांना स्वतःशी, इतरांशी आणि अज्ञात लोकांशी चांगले संबंध ठेवण्यास प्रोत्साहित करते. आध्यात्म तुम्हाला शांतता, उद्देश आणि क्षमाशीलतेची भावना देऊन तणावाचा सामना करण्यास मदत करू शकते. भावनिक ताणतणाव किंवा आजारपणाच्या वेळी ते अधिक महत्त्वाचे ठरते. बौद्ध धर्म हा जगातील सर्वात मोठ्या धर्मांपैकी एक आहे. सुमारे २,५०० वर्षांपूर्वी भारतात त्याचा उगम झाला.

बौद्धांचा असा विश्वास आहे की, मानवी जीवन हे दुःखाचे आहे. ध्यान, आध्यात्मिक, शारीरिक श्रम आणि चांगले वर्तन हे आत्मज्ञान किंवा निर्वाण मिळविण्याचे मार्ग आहेत. जन्म-मृत्यूची ही साखळी संपवून निर्वाण किंवा मोक्ष प्राप्त करणे हाच जीवनाचा उद्देश आहे. एक लोकप्रिय बौद्ध शिकवण आहे कि, जे वाईट आहे त्यापासून दूर राहणे, जे चांगले आहे ते जोपासणे, मन शुद्ध करणे. ही बुद्धांची शिकवण आहे.

आध्यात्म म्हणजे आपल्यापेक्षा मोठ्या गोष्टीशी अर्थपूर्ण संबंध शोधणे, ज्याचा परिणाम शांतता, विस्मय, समाधान, कृतज्ञता आणि स्वीकृती यासारख्या सकारात्मक भावनांमध्ये होऊ शकतो. आध्यात्म हा उपचाराचा अविभाज्य घटक आहे, ते संकटाच्या उपस्थितीत शक्तीचा स्त्रोत आहे, हे आपल्या कल्याणाच्या केंद्रस्थानी आहे आणि आपल्या जीवनातील सर्व पैलू समृद्ध करते. शारीरिक, मानसिक, भावनिक आणि नातेसंबंध सुधारण्यास मदत करते.

दुःख, अपराधीपणा, संताप, क्षमाशीलता, आत्म-नाकार आणि लाज या वेदनादायक जखमा भरून काढण्यासाठी प्रत्येक मनुष्याला आध्यात्मिक संसाधनांची आवश्यकता असते. आपला विश्वास, स्वाभिमान, आशा, आनंद आणि जीवनावरील प्रेमाचे अनुभव अधिक सखोल करण्यासाठी आपल्याला आध्यात्मिक संसाधनांची देखील आवश्यकता आहे. बौद्ध धर्मातील एक मध्यवर्ती विश्वास बहुतेक वेळा पुनर्जन्म म्हणून ओळखला जातो. ही संकल्पना अशी आहे की, लोक मेल्यानंतर पुनर्जन्म घेतात. खरं तर, बहुतेक व्यक्ती जन्म, जगणे, मृत्यू आणि पुनर्जन्म अशा अनेक चक्रांमधून जातात. बौद्ध धर्माचे आचरण करणारे काहीजण पुनर्जन्म या संकल्पनांमध्ये फरक करतात.




बौद्ध धर्म शिकवतो की, जीवन असमाधानकारकतेमुळे दुःख निर्माण करणारे आहे आणि जीवनात यावर मात करण्याचा मार्ग बुद्ध धर्म प्रदान करतो. बौद्ध धर्म हा जागतिक धर्मांमध्ये अद्वितीय आहे कारण वैयक्तिक देवावर विश्वास नाही. बौद्ध धर्म हा मानवी अनुभव आणि क्षमतेवर आधारित आहे. बौद्ध धर्म अशी जीवनपद्धती शिकवतो जो अतिरेक करणे टाळतो. आध्यात्मात भावना, संवेदना किंवा विश्वास आहे की, माझ्यापेक्षा काहीतरी मोठे आहे, संवेदनात्मक अनुभवापेक्षा मानव असण्यापेक्षा काहीतरी अधिक आहे आणि ज्याचा आपण भाग आहोत तो वैश्विक किंवा दैवी निसर्ग आहे.

जीवनात आपल्याला नेहमीच आव्हानांचा सामना करावा लागतो, परंतु या कठीण काळात आपण आशावादी राहिलो तर आपण धीर धरून आपले जीवन आनंदी करू शकतो. आध्यात्मिक वाढ जीवनातील चढ-उतारांना सामोरे जाण्याची आणि त्या कठीण अनुभवातून परत येण्याची आपली क्षमता वाढवते. आध्यात्म लोकांना आजारपण, दुःख आणि मृत्यूला सामोरे जाण्यास मदत करते, असे भगवान बुद्ध ह्यांच्या आध्यात्मिक शिकवणीत दिसते. जीवनाच्या शेवटच्या निर्णयांवरही आध्यात्माचा प्रभाव पडतो. संघटित धर्म किंवा कोणत्याही आध्यात्मिक पद्धतींशी संबंध नसलेल्या सर्व लोकांना त्यांच्या स्वतःच्या अर्थाची, उद्देशाची आणि जोडणीची जाणीव करून घेण्याचा फायदा होतो.

बौद्ध धर्मात, आनंद तेव्हाच प्राप्त होतो, जेव्हा एखादी व्यक्ती वास्तविकतेचे खरे स्वरूप जाणू शकते, ज्या मानसिक बांधणीने आपण त्यावर अधिभार लावतो त्याद्वारे अपरिवर्तित केले जाते. व्यापकपणे पाळल्या जाणाऱ्या पद्धतींमध्ये ध्यान, नैतिक नियमांचे पालन, मठवाद, बुद्ध, धर्म आणि संघ यांचा आश्रय घेणे आणि पारमितांची म्हणजेच परिपूर्णता किंवा सद्गुण यांची जोपासना, यांचा समावेश होतो. मुख्य बौद्ध मूल्ये म्हणजे प्रेम, शहाणपण, चांगुलपणा, शांतता आणि आत्म-नियंत्रण ही होत. बौद्ध मानतात की लोकांनी दुःख संपवण्याचा प्रयत्न केला पाहिजे; सर्व गोष्टींकडे स्वतःचे किंवा अत्यावश्यक स्वरूप नसल्यासारखे पाहिले पाहिजे. विश्वास प्रणाली असल्याने इतरांना सांत्वन, उद्देश आणि जोडणी मिळू शकते. हे विशेषतः आव्हानात्मक काळात अधिक जरुरीचे आहे. धार्मिक जीवनाचा अंतिम अंत म्हणजे मनाची अटळ मुक्ती हा आहे. केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीने अत्यंत अभ्यासपूर्वक भगवान बुद्ध यांचे आध्यात्मिक विचार आणि वर्तन समजून घ्यावे, शक्य तितके ते अंगीकारण्यासाठी सातत्याने स्वतः प्रयोगशील राहावे.

**पुस्तकाचे नाव : भगवान बुद्ध यांची आध्यात्मिक शिकवण**
**लेखक : विद्यावाचस्पती विद्यानंद**
**प्रकाशक : घेरा पानवडी फौंडेशन, पुणे**

# आधुनिक युगातील... ज्ञानेश्वर !



सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

आधुनिक केसरी

**ज्ञानेश्वर कुलकर्णी माझ्या परममित्राचा आज वाढदिवस. तो ६१ वर्षात पदार्पण करीत आहे. त्याच्या सहवासातील अनंत आठवणींची उकल करण्यासाठी मी लेखणी हाती घेतलेली आहे खरी. पण मनं अनंत आठवणींच्या हिंदोळ्यावर हेलकावे घेत आहे. ज्ञानेश्वर कुलकर्णी यांच्या सहवासातील सुखद आठवणीचा भावतरंग अंतकरणात उमटतोय तर नव्याने उमटून आलेल्या तरंगामुळे पहिला तरंग विरून जात आहे. अशीच काहीशी भावना, स्थिती माझ्या मनाची झालेली आहे.**

ज्ञानेश्वर कुलकर्णी यांच्या ओंजळीत पांडुरंगाने संत साहित्याच्या रूपाने अनेक प्राजक्ताची फुलं दिलेली आहेत. त्यांनी आपल्या ह्रदयाच्या अंतरंगात शब्द रूपांच्या मेरुंनी, विचारांच्या सोनसाखळीनी साहित्य रसाचे मंथन केले. त्यामधूनच अगणित अभंगाची निर्मिती त्यांनी केली. याच अभंगाच्या माध्यमातून भरलेले रसाअमृताचे मंगल कलश त्यांनी अनेक मंदिरातून आपल्या विवेचनातून, ज्ञानेश्वरीच्या व्याख्यानातून, त्यानंतरच्या निरूपणातून श्रोत्यांच्या हाती भरभरून दिले. ज्यांच्या हाती हे रसाअमृतांच्या विचारांचे मंगलकलश मिळाले त्यांना विलक्षण आत्मिक सुखाची अनुभूती मिळालं जाणवलं. कुलकर्णीयांनी अनेक कवी संमेलनाच्या व्यासपीठावर अध्यक्षपद भूषविलं. आपल्या काव्यरचना देखील सादर केल्या. त्या काव्यरचनाही श्रोत्यांना मंत्रमुग्ध करुन गेल्या. कुलकर्णी यांनी ज्ञानेश्वरीच्या हस्तलिखिताचे कार्य त्यांच्या निवासस्थानी अविरतपणे सुरू केलेले आहे. ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी स्वतः रचून सहाशेहून अधिक अभंगाची निर्मिती केली आहे. ज्ञानेश्वरांचे हे अभंग औरंगाबादमधील सुप्रसिद्ध गायकांनी स्वतः संगीतबद्ध करुन गायलेले आहेत.

ज्ञानेश्वर कुलकर्णी यांच्या ओंजळीत पांडुरंगाने "घेशील तू किती दो कराने" म्हणत अभंगाच्या रूपाने संत साहित्याची प्राजक्ताची फुले ओंजळीत दिलेली आहेत. या संत साहित्याच्या माध्यमातून ज्ञानेश्वर यांनी अगणीत अभंगाची अतिशय सुंदर शब्दात रचना केलेली आहे. ज्ञानेश्वरांनी स्वतः रचलेल्या या अभंगाच्या शब्द सुमनांचा सुगंध आज अनेक श्रोत्यांना रसिकांना लाभलेला आहे. ज्ञानेश्वर कुलकर्णी यांच्यासारख्या शब्द प्रभूंचे शब्द जेव्हा अभंगाच्या माध्यमातून काव्य रसांची उधळण करत येतात तेव्हां त्यांच्या अंतरंगातील भावतरंग अत्यंत तरलतेने निखळ सौंदर्य शब्द शब्दातून व्यक्त होत जाते. मग अशा अभंगातील शब्द शब्दांचा अर्थ लावणाऱ्या, ऐकणाऱ्या रसिकांच्या अंतरंगात तो भावपूर्ण अर्थ स्पर्शून जातो हे बाकी खरं. अशा भावपूर्ण अभंगाच्या शब्द शब्दांचा अर्थ लावताना त्या रसिकांचे शब्दही निशब्द होऊन जातात. मग त्या रसिकांना, त्या श्रोत्यांना असंच म्हणावं लागतं... शब्दावाचुनि कळले सारे शब्दांच्या पलिकडले....हे बाकी खरं...

ज्ञानेश्वर माधवराव कुलकर्णी (वतनी) एका गरीब शेतकरी कुटुंबात जन्मलेला हा मुलगा. वडील शिक्षक तर आई मात्र शिकलेली नव्हती. चार भाऊ, चार बहिणी. लातूर जिल्ह्यातील अहमदपूर हे ज्ञानेश्वरांचे मुळगाव. ज्ञानेश्वरांची आई पहाटे जात्यावर दळण दळत असताना ज्ञानेश्वर त्यांच्या मांडीवर पहुडलेला असे. आईच्या मुखातून अगणित ओव्या तो ऐकत असे. त्याच वेळेस वडील पूजा-अर्चा करत असत. त्यांच्या तोंडातून अनेक अभंग बाहेर पडत असत. या संस्कारातून ज्ञानेश्वराचे बालपण गेलं. जात्याच्या ओव्या नि वडिलांचे अभंग ऐकत. त्यांच्या ह्रदयात हीच बालपणी साहित्याची बीजे रुजली गेली. पुढे मित्रांबरोबर अहमदपूरच्या दत्त मंदिरात पहाटे तो काकडा आरतीला जात असे. ज्ञानेश्वरांचे वडील शिक्षक होते पण रात्री मंदिरातून ते भजन कीर्तन प्रवचन करीत असत. वडीलांच्या बरोबर, मित्रांच्या बरोबर ज्ञानेश्वरही भजने कीर्तने अत्यंत तृप्त मनाने टाळ वाजवीत ऐकत असे. कळत-नकळत याच भजन कीर्तनतून.. अभंगातून.. निरुपणातून.. प्रवचनातून ज्ञानेश्वर घडत गेला. ज्ञानेश्वर आनंत अडचणीला सामोरे जात होता. त्यावेळेस त्यांच्या मामाने हे पाहून आंबेजोगाईला आपल्या घरी शिक्षणासाठी ठेवून घेतले. बीकॉम, एमकॉम, बीएड अशी शैक्षणिक वाटचाल ज्ञानेश्वरांनी पूर्ण केली. पण संघर्ष अजून संपलेला नव्हता. शिक्षण पूर्ण केले पणं पुढे काय. नोकरी मिळेना. मग ज्ञानेश्वरांनी घरीच ट्युशनवर भर दिला. आपल्या ज्ञानातून विद्यार्थ्यां घडवण्यासाठी उपयोगी आणले. चार भावाबहिणींची मोठी जबाबदारी ज्ञानेश्वर होती त्यामुळे त्याचे मन उदास होत असे अशा वेळी त्यांच्या शेतातील पूर्वजांची हेमाडपंथी समाधी होती त्या ठिकाणी आपले मन शांत करण्यासाठी ज्ञानेश्वर तासन तास त्या समाधी समोर मनन चिंतन करत असे. मन शांत करण्यासाठी समाधी समोर बसलेल्या ज्ञानेश्वरांना मग अनेक काव्य अंतकरणापासून स्पृरत असतं.

हाच विश्वास त्यांना त्यांच्या भविष्यातील काव्य रचनेसाठी उपयोगात आला. तरुण वयात ज्ञानेश्वर यांनी लिहिलेली कविता युवक महोत्सवात रौप्यपदक देऊन गेली. ज्ञानेश्वराच्या काव्य रचनेला परमेश्वराने घातलेली ही पहिली साथ होती असेच म्हणावे लागेल. पुढे ज्ञानेश्वरांना औरंगाबादच्या नालंदा महाविद्यालय प्राध्यापक म्हणून नोकरी मिळाली. ते शेवटी याच नोकरीत प्राध्यापक म्हणून निवृत्त झाले.

ज्ञानेश्वर कुलकर्णींच्या अनंत आठवणींची शिदोरी ह्रदयात साठवून ठेवलेली आहे... पण त्यामधील एक खूप मोलाची आठवणींची उकल आपणांस मोर करीत आहे. माझा परममित्र हा घडला गेला नी कळत नकळत त्याला संत ज्ञानेश्वरांनीच जणू आशीर्वाद दिला नी पुढे त्यांच्या कडून अलौकिक अभंगाची निर्मिती होतं गेली. त्या अनमोल क्षणांची आठवण आजही आठवली तर अंगावर रोमांच उभे राहतात हे बाकी खरं...

दिवाळीचा पहिला दिवस.




सारेजणच मोठ्या उत्साहात होते.पहाटेची वेळ.. ज्ञानेश्वर कुलकर्णीच्या घरातही वातावरण आनंदाचे होते. दिप्ती..दिक्षा दोन्ही मुलींचे बाबांच्या बरोबरीनेच स्नान होऊन मंदिरात दर्शनाला जाण्यासाठी तयारीत होत्या.माझा मित्र ज्ञानेश्वर आज अस्वस्थ होता. त्याच्या पत्नीनेही जाणवलं. विद्या आज माझं मनं अस्वस्थ झाले आहे.मनात हूरहूर लागली आहे. कोणतरी साद घातल्या सारखं.. कोणतरी बोलवतय असच वाटतंय.माझं मनं दिवाळी असुनही उदासीन आहे.विद्यानी सल्ला दिला.तुम्ही नेहमीसारखं नेवाश्याला जाऊन दर्शन घेऊन या मनं प्रसन्न होऊन जाईल.ज्ञानेश्वरनी बॅगमध्ये दोनकपडे घातले.तो नेवाश्याला आला.माऊलीच्या मंदीराच्या प्रमुख गुरुजींना सांगितले.पुरोहितांनी धीर दिला. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली त्या खांबाचे दर्शन कुलकर्णींनी घेतले.खिन्न मनांनी समोरचं डोळे मिटून अंतर्मुख होऊन बसला... संपूर्ण मंदीरात निरवं शांतता होती.दिवाळीचा सण असल्याने मंदिरात वर्दळ नव्हती.स्तब्ध...नीशब्द अंतर्मुख होऊन बसलेला ज्ञानेश्वर दोनतास माऊलींच्या खांबांच्या समोरच निशब्द अवस्थेतच होता... त्याच्या मनातील उदासिनता हळूहळू संपत गेली .मनं विलक्षण प्रसन्न झालं होतं... अंगावर शहारे आले होते... डोळे बंद असुनही आनंदाश्रूनी भरुन आले होते... कोणतरी साद घालतोय .. सांगतंय अशीच मनांची भावस्थीती होऊन गेलेली होती... पाहता पाहता..ज्ञानेश्वर कुलकर्णींनां अभंग सुचला...पेन होतं पण कागद नव्हता..मंदारात कागद त्याक्षणी मिळालाच नाही... स्वतःचा पायजामाच थोडासा उलटा केला...नी पायजम्याच्याच आतील बाजूने ...सुचलेला पहिला अभंग लिहून काढला...

दोन वर्षांपूर्वीची ही दिवाळी होती... ज्ञानेश्वरांनी अभंग रचण्यास सुरुवात केलेली होती.... आजही ज्ञानेश्वरांच्या अभंगाची निर्मिती रोज नित्यनेमाने सुरुच आहे. पहाटे पहाटे उठून.. स्नान आपटुन माऊलींच्या फोटो समोर उदबत्ती लावून मनोभावे पूजा करुन... अभंगाची रचना करण्याचें अनमोल कार्य नित्य नियमाने सुरुच आहे... आजपर्यंत ६००हून अधिक अभंगाच्या रचना ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी केलेल्या आहेत...

ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी रचलेले अभंग औरंगाबादच्या दैनिक आधुनिक केसरी या ई- पेपर मध्ये गेल्या वर्षभरापासून रोज वेगवेगळे अभंग प्रसिद्ध करण्यात येत आहेत. ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी विपुल प्रमाणावर चौफेर लेखन केलेले आहे. सोलापूरच्या दैनिक सोलापूर तरुण भारत मध्ये दीपावली अंकामध्ये त्यांचा खूप सुंदर लेख प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. त्याच बरोबर दैनिक सकाळ, दैनिक दिव्य मराठी, दैनिक पुण्यनगरी, दैनिक पुढारी आशा विविध मासिकांमधून.. वृत्तपत्रांमधून त्यांचं अध्यात्मिक विषयावरील लिखाण खूप मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध झालेला आहे. औरंगाबादच्या अनुनाद कला अविष्कार प्रस्तुत साधता संवाद यामध्ये ज्ञानेश्वरांनी रचलेल्या अभंगाच्या गायनाचे कार्यक्रम प्रसिद्ध करण्यात आला त्याचे निवेदन आकाशवाणीच्या वृत्तनिवेदिका सौ राजश्री पोहेकर कुलकर्णी यांनी केले होते.

अनुनाद कलाविष्कार यांच्या साधता संवाद या माध्यमातून 22 अभंगांना औरंगाबादच्या विविध मान्यवर गायकांनी गायले होते. त्याचबरोबर ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी चे वाचन निरूपण अनेक मंदिरात केलेले आहे .संत जनाबाई व्याख्यानमाले मध्ये गंगाखेड येथे ऑनलाईन " संत ज्ञानेश्वराचे संतसाहित्यातील योगदान " या विषयावर त्यांनी व्याख्यान दिले होते. गीता जयंतीच्या निमित्ताने गीता भवनात " ज्ञानेश्वरांचे जीवन चरित्र " यावरही त्यांनी खूप सुंदर विवेचनात्मक व्याख्यान दिले होते. ज्ञानेश्वर कुलकर्णी यांच्या पत्नी विद्या आणि त्यांच्या दोन मुली दीप्ती व दीक्षा यांचे ज्ञानेश्वर यांच्या जीवनात त्यांच्या सर्व गोष्टीसाठी खूप मोलाचे योगदान आहे हे बाकी खरं. आपल्या पत्नी विद्या आणि मुली दोन्ही मुली यांच्या स्वतःच्या पाठिंब्यावर ज्ञानेश्वर आपले जीवन समृद्ध सुजलाम-सुफलाम करू शकले हे मोठ्या अभिमानाने सांगतात .

ज्ञानेश्वर नित्य नियमाने रोज करीत असलेली अभंगाची निर्मिती... प्रवचने...निरुपणे.. संत ज्ञानेश्वर यांच्या जीवनावरी व्याख्याने..हे सारं पाहून ज्ञानेश्वर कुलकर्णी यांना आधुनिक युगातील ज्ञानेश्वर असंच मला म्हणावसं वाटतं. ज्ञानेश्वरांना त्यांच्या भविष्यातील सर्व संकल्पना साठी आम्हा सर्वांच्या मनापासून खूप खूप शुभेच्छा!

# ध्यास गझल

## ‘वृत्त-विस्तार’

**‘मात्रावृत्ते-’**

‘मात्रावृत्त’ म्हणजे काय हे आपण पुन्हा एकदा अभ्यासू.
‘जेव्हा एखाद्या गझलेच्या ओळीत समान मात्रा असतात, मात्रांची संख्या प्रत्येक ओळीत समान असते त्या वृत्तास ‘मात्रावृत्ते’ असे म्हणतात. यालाच ‘जाती’ असेही म्हणतात.
‘लयात्मकता’, ‘गेयता’ हे गुण या प्रकारच्या रचनेत दिसून येतात.
गझल रसिकांनो,
एक लक्षात घ्या की, प्रत्येक अक्षरगणवृत्ताचे एक मात्रावृत्त असते. अक्षरगणवृत्तात दोन लघुचा एक गुरू करता येण्याची सूट बरेच गझलकार घेताना दिसतात. ही सूट आता कॉमन झाली आहे. पण; ही सूट एका गझलेत किती वेळा घ्यावी ह्याला काही मर्यादा आखलेली नाही.. तरीही छंद शास्त्रानुसार जर आपण ही सूट घेतली तर ते अक्षरगणवृत्त राहत नाही ते मात्रावृत्ताकडे वळते होते. म्हणूनच म्हटले आहे की आजच्या अक्षरगणवृत्तात लिहिलेल्या गझला १००% (पूर्णतः) अक्षरगणवृत्तात नसतात. त्यातून मात्रावृत्त डोकावत असते. बोटावर मोजण्या इतक्या अक्षरगणवृत्तात गझला सापडू शकतील. म्हणून सांगावे लागते की प्रत्येक अक्षरगणवृत्ताचे एक ‘मात्रावृत्तीय’ रूप असते. त्या वृत्ताची नामे सुद्धा वेगळी असतात.

**‘आवर्तनी मात्रा वृत्ते-’**

मात्रा मोजत असतांना जेव्हा एक सारख्या मात्रांचे समूह पुन्हा पुन्हा येत असतील, त्यांचे रिपिटेशन होत असेल तर अशा मात्रावृत्तांना ‘आवर्तनी मात्रावृत्ते’ असे म्हटले जाते.
मात्रावृत्तात लघु-गुरू क्रमाची शिथिलता असते. त्यात तो क्रम नाही पाळला तरी चालतो. लघु-गुरू क्रमाची चौकट नसल्याने कवी-गझलकार मात्रावृत्तात सहजतेने रचना करताना दिसतात. अशा वृत्तात गझल लिहिणे तुलनेने सोपे जाते. नव्या पिढीतील गझलकार मात्रावृत्तात गझल लिहिणे पसंत करतात. परंतु गझल गायकीच्या दृष्टीने गायक व संगीतकार ह्यांना अक्षरगणवृत्तातील गझला गायला / संगीत द्यायला तुलनेने सहज वाटतात.
‘मात्रिकवृत्तात’ गझलकाराला शब्द संयोजन करताना सूट मिळते. लघु-गुरू चे बंधन हटल्याने विविध दर्जेदार खयाल सोप्या, साध्या शब्दात गुंफवले जाऊ शकतात. मात्र इथे ‘यतीच्या’ नियमांचे पालन तंतोतंत व्हायला हवे नाहीतर ‘लय’ बिघडते आणि लय बिघडली की ‘गझल’ बिघडते. असे ‘ऐब’ म्हणजे ‘दोष’ गझलेत येऊ नयेत. ‘निर्दोष वृत्तबद्ध’ रचना आपल्या कवी-गझलकारांचे कार्य आहे.

**‘आवर्तनी मात्रा वृत्ताचे विविध प्रकार..’**

**१) ‘पद्म गट-’(अष्ट मात्रिक)**
यालाच ‘पद्मावर्तनी मात्रावृत्त’ असे म्हणतात.
जेव्हा ८-८ मात्रांचे गट पुन्हा पुन्हा रिपीट होतात ते ‘अष्टमात्रिक’ गट होत. यालाच ‘पद्म गट’ म्हणतात. यालाच ‘प’ गट असे संक्षिप्त नाव आहे
या प्रकारात अनेक वृत्त येतात पण काही महत्वाची नावे पुढील प्रमाणे.

**‘वनहरिणी’**
(३२ मात्रा)
मात्रा खंड (८-८-८-८)
उदाहरण -गझलकारा- प्राजक्ता पटवर्धन

**तुला पाहुनी अलगद काही आत हालले या वेळीही**
**भेटू, बोलू जावे म्हणता पाय थबकले.. या वेळीही..**

**काल वाटले उदासवाणे आज अचानक मोहरलेही**
**मना पुरवले तुझ्या ऋतूंचे पुन्हा चोचले या वेळीही..**

**हरिभगिनी**
(३० मात्रा)
मात्रा खंड (८-८-८-२-२-२)
असे ‘मात्रिक गट’ या वृत्तात पडतात.
अनंत फंदी ह्यांचा फटका हा काव्य प्रकार म्हणजे ह्या वृत्ताचे सर्वश्रुत उदाहरण होय.
एक उदाहरण पाहू.

**‘वर्म काढुनी शरमायाला, उणे कुणाला बोलूं नको**
**बुडवाया दुसऱ्याचा ठेवा, करूनी हेवा, झटू नको**

**मी मोठा शाहणा, धनाढ्यही, गर्वभार हा वाहू नको**
**एकाहून चढ एक जगामंधि, थोरपणाला मिरवू नको**

**लवंगलता**
(२८ मात्रा) -या वृत्तात
मात्रिक खंड (८-८-८-२-२)

आधुनिक केसरी



गिरीश शाम जोशी
संपर्क क्र. ९२२६७५०६२१

**गझलप्रेमी रसिकांनो,**

**गझल समजून घेतांना तिचे स्वरूप, परिचय, आकृतिबंध आपण पाहत आहोत. मागील भागात आपण ‘वृत्त विस्तार’ या विषयात अवर्तनी ‘अक्षरगणवृत्तांचा’ अभ्यास केला. या लेखात आपण ‘आवर्तनी मात्रावृत्तांचा’ अभ्यास करणार आहोत.**

असे मात्रिक गट असतात.
ह्या वृत्ताचे उदाहरण म्हणून सुप्रसिद्ध गझलकार /कवी/अभ्यासक विजय जोशी सरांचे २ शेर पाहूया

**विझण्यासाठी दिवा कधीचा फडफड करतो आहे**
**मरणेसुद्धा महाग झाले म्हणून जगतो आहे**

**खोटी बाजू रेटुन नेणे खेळ रडीचा येथे**
**सत्य पटविण्या जगास माझे मीच झगडतो आहे.**

**पादाकुलक (१६ मात्रा)**
माझ्या गझलेचे एक उदाहरण देतो..

**उथळपणातच ढोंग नाहते**
**उतरून पाहू खोल एकदा..**

**उभा राहिलो धडपडल्यावर**
**गेला होता तोल एकदा..**

**आयुष्याला लाट खुबीने**
**जमेल पोळी गोल एकदा....**

सचिन वालतुरे युवा गझलकार म्हणतात,

**माय शेवटी मायच ती**
**अजून म्हणते बाळ मला..**

पादाकूलक ची अशी काही उदाहरणे देता येतील.

**बालानंद (१४ मात्रा)**

**कशास करतो गर्व नभा**
**माझ्यामधला खग बाकी**

**सरणावरती शव निजले**
**आत्म्याची दगदग बाकी**

‘पद्मगट’ यातील एक महत्वाचे वृत्त म्हणजे अनलज्वाला होय.. या वृत्तात अनेक गझला आढळतात.
**अनलज्वाला-**
२४ मात्रा
मात्रा खंड (८-८-८)
सुप्रसिद्ध गझलकार वीरेंद्र बेंडसे ह्यांचे काही शेर बघा

**टाळलेस तू मागे बघणे वळता वळता**
**की नजरेची भेट राहिली घडता घडता**

**वेड विलक्षण बघ रात्रीचे काजव्यासही**
**नदी किनारी सखी शोधतो जळता जळता**

**सुप्रसिद्ध गझलकार रूपेश देशमुख ह्यांचे काही शेर पहा,**

**नको उभारू असा दुरावा, एक फोन कर**
**ठरेल खोटा तुझाच दावा, एक फोन कर**




**रुसवे फुगवे प्रेमाचा हा भागच आहे**
**त्यानंतर संवाद असावा, एक फोन कर**

**क्षणोक्षणी मी तुझी आठवण काढित असते**
**या गोष्टीला काय पुरावा, एक फोन कर**

**शुभगंगा-**
मात्रा खंड (८-८-२-२-२)
मात्रा २२ असे एकदा जवळ तिच्या जावे म्हणतो जसे तिच्या डोळ्यांपाशी काजळ येते.

**सर्व श्रेष्ठदात्याचा विचार करतांना**
**डोळ्यासमोर आईची ओंजळ येते**

**२) भृंगावर्तनी मात्रा वृत्ते-**
ज्या मात्रा वृत्तात ६-६ मात्रांचे गट किवा खंड पडतात त्यास ‘भृंगावर्तनी’ मात्रावृत्त म्हणतात.
या गटाचे चिन्ह ‘भृ’ आहे. यात अनेक वृत्ते असली तरी काही महत्वाची नावे पुढील प्रमाणे

**जीवनलहरी**
(१२ मात्रा)
६-६- चे दोन गट.
उदाहरण..

**का लपुन पाहतेस**
**प्रेम सुमन वाहतेस**

**या भयाण रानातुन**
**एकटीच चालतेस**

विनोद - (गागाल, गालगागा)
म्हणजेच ‘आनंद’ नावाचे अक्षरगणवृत्त होय.

**रसना -**
हे ‘आनंदकंद’ ह्या अक्षरगणवृत्ताचे रूप होय.
२४ मात्रा (गागाल गालगागा×2)
मुळात आनंदकंद सदृश लयीत असणाऱ्या रसना वृत्तातील सुप्रसिद्ध गझलकारा प्राजक्ता पटवर्धन ह्यांचे काही शेर पाहू

**झिडकारतो दिवस हा देतो कुठे न थारा**
**काळोख वाटतो मग खात्रीतला निवारा**

**निसटून रोज जातो, छळतो किती धरेला**
**ठेवा जरा ढगांनो सूर्यावरी पहारा**

**३) कवळलिंब -**
म्हणजे ‘क’ गट.
ज्या मात्रा वृत्तात ५-५ मात्रांचे गट पडतात त्यास क गट म्हणतात किंवा ह्यालाच ‘हरावर्तनी मात्रावृत्ते’ असेही म्हणतात. ह्यात अनेक वृत्तप्रकार आहेत पण काही महत्वाची नावे पुढील प्रमाणे अविनाशी (१९ मात्रा)
**किंकिणी (२० मात्रा)**
**‘वरमंगला’ -**
(गालगा)×४ स्त्रग्विनी ह्या अक्षरगण वृत्ताचे हे रूप आहे
(२० मात्रा)
गझलसम्राट सुरेश भट ह्यांचा एक शेर पाहूया

**‘रुणझुणत राहिलो किणकिणत राहिलो**
**जन्मभर मी तुला ये म्हणत राहिलो...’**

**वीणावती -**
अक्षरगणवृत्त ‘सौदामिनी’ चे हे मात्रिक रूप होय.
**कमलचर्या-**
अक्षरगण वृत्त ‘भुजंगप्रयात’ चे हे मात्रिक वृत्त होय.
४)अग्न्यावर्तनी मात्रा वृत्त-
जेव्हा ७-७ मात्रांचे गट पुन्हा पुन्हा एखाद्या रचनेत येत असतील, त्यांचे रिपिटेशन होत असेल त्या मात्रावृत्तास ‘अग्न्यावर्तनी मात्रावृत्त’ -म्हणतात
यातही अनेक वृत्ते येतात. मात्र, याठिकाणी काही ठाराविक वृत्तांची नावे देत आहे.
**कालगंगा-**
२८ मात्रा हे वृत्त म्हणजे देवप्रिया ह्या अक्षरगण वृत्ताचे मात्रिक रूप होय. सुप्रसिद्ध गझलकार डॉ शिवाजी काळे ह्यांची या वृत्तातील गझल पहा..

**जीवना माझ्याच काचांवर मला तू नाच म्हण**
**मी शहाण्यासारखा जगलो तरी वेडाच म्हण**

**चांगले घडणार असले तर चुकू द्यावे गणित**
**एकदा तू दोन गुणिले दोन म्हणजे पाच म्हण**

**जर तुझ्या हळव्या मनाला वाचता येतो दगड**
**तर भुगा माझ्या मनाचा फुरसतीने वाच म्हण**

**वर्षभर हृदयामधे हा गारवा टिकतो कसा ?**
**श्रावणाला यापुढे माझ्यामधेही साच म्हण**

**स्वत्व जपताना पुसटशी रेघ आपण ओढली**
**पाहिजे तर आपल्या नात्यातली तू खाच म्हण**

**मेघगंगा-**
२१ मात्रा, हे वृत्त म्हणजे मंजूघोषा वृत्ताचे मात्रिक रूप होय.

**जीवकलिका २८ मात्रा,**
वियदगंगा ह्या अक्षरगण वृत्ताचे हे मात्रिक रूप होय.


गझल स्नेही मंडळी, वृत्त विस्तार ह्या भाग आज आपण इथेच थांबुयाय.. बाकी पुन्हा भेटू नव्या माहितीसह, नव्या लेखात.

**(क्रमशः)**

# भारतीय माहिती क्रांतीचे जनक राजीव गांधी

आधुनिक केसरी

भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचा आज ३१ वा स्मृतीदिन. राजीव गांधी यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हटले जाते. आधुनिक विचार आणि कठोर निर्णयामुळे राजीव गांधी यांनी जगात भारताची वेगळी ओळख निर्माण केली. २० ऑगस्ट १९४४ रोजी जन्मलेले राजीव गांधी हे भारताचे सर्वात तरुण पंतप्रधान होते. वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी राजीव गांधी हे भारताचे पंतप्रधान बनले. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांचे जेष्ठ सुपुत्र असलेले राजीव यांना राजकारणात रस नव्हता.
देशातील सर्वात प्रतिष्ठित राजकीय घराण्यात जन्म घेऊनही राजीव गांधी हे राजकारणापासून दूरच होते. राजीव गांधी यांचे शिक्षण डेहराडूनच्या शाळेत झाले. त्यानंतर ते हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या डुन च्या निवासी शाळेत दाखल झाले. तिथे त्यांना अनेक मित्र भेटले. या मित्रांशी त्यांनी आयुष्यभर मैत्री जपली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते केम्ब्रिजच्या



ट्रीनीटी महाविद्यालयात गेले पण लवकरच लंडन स्थित इम्पेरियल महाविद्यालयात प्रवेश घेतला. तिथे त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा अभ्यास केला. त्यांना विज्ञान, तंत्रज्ञान या विषयात खूप रस होता ते या विषयाची पुस्तके वाचून काढत. विमान उड्डाण करून आकाशात उडावे अशी त्यांची इच्छा होती त्यासाठी त्यांनी वैमानिक होण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडमध्ये त्यांनी फ्लायिंग क्लबची परीक्षा दिली आणि वैमानिक बनले. लगेचच ते इंडियन एअर लाईन्सचे देशांतर्गत सेवेचे वैमानिक बनले. लंडनमध्येच त्यांची आणि सोनिया गांधी यांची मैत्री झाली मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले आणि १९६८ साली त्यांचा विवाह झाला. राजीव गांधी हे अपघातानेच राजकारणात आले. १९८० साली राजीव गांधी यांचे बंधू संजय गांधी यांचा अपघातात मृत्यू झाला. संजय गांधी यांच्या मृत्यूनंतर राजीव गांधी यांनी राजकारणात प्रवेश करावा अशी मागणी काँग्रेस मधील नेत्यांकडून होऊ लागली.
आई इंदिरा गांधी यांनीही राजीव गांधी यांना राजकारणात उतरण्याची सूचना केली तेंव्हा राजीव यांनी आपल्या भावाच्या संजय गांधी यांच्या अमेठी या मतदारसंघातुन निवडणूक लढवली व मोठ्या मताधिक्याने ती जिंकली. १९८२ साली दिल्लीत भारताने आशियाई क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले. या स्पर्धेच्या नियोजनाची सर्व जबाबदारी राजीव गांधी यांच्याकडे होती त्यांनी ती यशस्वीरीत्या पेलून ही स्पर्धा यशस्वी केली. ३१ नोव्हेंबर १९८४ इंदिरा गांधी यांची हत्या झाली. हत्या झाली तेंव्हा इंदिरा गांधी या देशाच्या पंतप्रधान होत्या त्यामुळे मोठा घटनात्मक पेच निर्माण झाला. पंतप्रधानपदासारखे देशातील सर्वोच्च पद जास्त दिवस रिक्त ठेवता येणार नाही असे घटना तज्ज्ञांचे मत होते त्यामुळे त्यांनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली. वैयक्तिक पातळीवर दुःख असूनही त्यांनी पंतप्रधान पदाची जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडली. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत त्यांनी काँग्रेस पक्षाला एकतर्फी विजय मिळवून दिला. या निवडणुकीत काँग्रेसला ४०० हुन अधिक जागा मिळाल्या. स्वतः राजीव गांधी हे विक्रमी मतांनी जिंकून आले होते. पंतप्रधान असताना त्यांनी देशात अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले. देशाला महासत्ता व्हायचे असेल तर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात देशाने प्रगती करायला हवी असे त्यांचे मत होते. २१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे असेल त्यासाठी देशातील प्रत्येक तरुण हा संगणक साक्षर असायला हवा असा त्यांचा आग्रह होता त्यामुळेच त्यांनी देशात संगणक आणला. स्वभावाने गंभीर पण आधुनिक विचाराच्या राजीव गांधी यांनी देशात माहिती तंत्रज्ञान युगाची मुहूर्तमेढ रोवली त्यामुळेच त्यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हणतात.
देशाला माहिती तंत्रज्ञानात परिपूर्ण करून महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या पंतप्रधानाचे २१ मे १९९१ रोजी लिट्टे या दहशतवादी संघटनेने मानवी बॉम्बचा वापर करून हत्या केली म्हणून आजचा दिवस देशभर दहशतवादी विरोधी दिवस म्हणूनही पाळण्यात येतो. राजीव गांधी यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

श्याम ठाणेदार
९९२२५४६२९५

# गोल्डन अवरमध्ये अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्यांना आता मिळणार बक्षीस

## 5 हजार रोख आणि प्रशस्तीपत्र, मदत करण्यास पुढे येणाऱ्या व्यक्तीचे होणार संरक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** रस्ते अपघातात सुवर्ण तासात अपघातग्रस्तांना वैद्यकीय मदत मिळाल्यास अनेकांचा जीव वाचू शकतो. मात्र कायदेशीर परिणाम आणि प्रक्रियात्मक अडचणींच्या भीतीने जखमींना मदत करण्यास घटनास्थळी उपस्थित लोक कचरतात. तथापि सर्वोच्च न्यायालयाने एका जनहित याचिकेवर सुनावणी दरम्यान दिलेल्या आदेशानुसार केंद्र शासनाच्या रस्ते, परिवहन आणि महामार्ग मंत्रालयाने अपघातग्रस्तांना मदत करण्यास पुढे येणाऱ्या व्यक्तींचे रक्षण करणे आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी चांगले समरिटन्स ही योजना आता लागू केली आहे. यामध्ये जखमींना मदत करून वैद्यकीय उपचार मिळवून देण्यासाठी सहाय्य करणाऱ्या व्यक्तीला रोख 5 हजार रुपये पारितोषिक आणि प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे.

गेल्या दहा वर्षात भारतात 13 लाखांहून अधिक लोकांचा रस्ता अपघातात मृत्यू झाला आहे. भारतीय रस्त्यावर दर तासाला 17 लोकांचा मृत्यू होतो. भारतीय विधी आयोगाच्या म्हणण्यानुसार, यापैकी 50% पीडितांचा मृत्यू टाळता येण्याजोग्या जखमांमुळे झाला. जर त्यांना वेळीच वैद्यकीय मदत मिळाली असती तर त्यांचे प्राण वाचवता आले असते. पिडीत व्यक्तीला आपत्कालीन काळजी प्रदान करण्यात मदत करणाऱ्या व्यक्तींची भूमिका महत्त्वाची असते.

तथापि, भारतात, कायदेशीर प्रक्रियात्मक अडचणींच्या भीतीने जखमींना मदत करण्यास उपस्थित लोक पुढे येत नाहीत. देशातील चारपैकी तीन लोक कायदेशीर प्रक्रीयेच्या त्रासामुळे, रूग्णालयात रुग्णाला ताब्यात घेण्यास विलंब आणि दीर्घकाळापर्यंत कायदेशीर औपचारिकता यामुळे रस्त्यावर अपघातग्रस्त जखमींना मदत करण्यास कचरतात. एखाद्याला मदत करायची असली तरी हे घटक त्यांना तसे करण्यापासून रोखतात.

2012 मध्ये, भारताच्या सर्वोच्च न्यायालयात एक जनहित याचिका (पीआयएल) दाखल करण्यात आली होती, ज्याने माननीय न्यायालयाला जखमींना मदत करण्यासाठी पुढे येणाऱ्या चांगल्या समरीटन्सचे रक्षण करण्याची विनंती केली होती. त्यानंतर न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार केंद्र शासनाच्या रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्रालयाने अपघातग्रस्तांना मदत करण्यास पुढे येणाऱ्या व्यक्तींचे रक्षण करणे आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी मंत्रालयाने मोटार वाहन दुरुस्ती कायदा 2019 च्या कलम 134 अ मध्ये दुरुस्ती करून चांगले समरिटन्ससाठी नियम लागू केले आहेत. यामध्ये जखमींना मदत करून वैद्यकीय उपचार मिळवून देण्यासाठी सहाय्य करणाऱ्या व्यक्तीला संरक्षण आणि प्रोत्साहन देण्यासाठी रोख 5 हजार रुपये आणि प्रशस्तीपत्र असे पारितोषिक देण्यात येणार आहे.

### पारितोषिकास पात्रता

प्राणघातक रस्ते अपघातात जखमींना मदत करण्यास पुढे येऊन त्यांना वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी रुग्णालयात पोहचविण्यास सहकार्य करणारी कोणतीही व्यक्ती या पारितोषिकासाठी पात्र ठरते.

### प्राणघातक अपघात म्हणजे काय?

ज्या रस्ते अपघातात जखमींवर मोठी शस्त्रक्रिया, कमीत कमी तीन दिवस रुग्णालयात भरती, मेंदूला किंवा मणक्याला गंभीर दुखापत झाली असल्यास त्या अपघाताला प्राणघातक अपघात म्हटले आहे.

### गुड समरिटन म्हणजे काय?

ही अशी व्यक्ती आहे जी सद्भावनेने, मोबदल्याची किंवा बक्षीसाची अपेक्षा न ठेवता आणि कोणतीही काळजी किंवा विशेष नातेसंबंध न ठेवता, अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीला तात्काळ आपत्कालीन वैद्यकीय मदत किंवा आपत्कालीन काळजी देण्यासाठी स्वेच्छेने पुढे येते.



**पहिल्या तासातच वैद्यकीय मदत मिळाली तर जवळपास 50 टक्के रस्त्यावरील अपघाती घटननांमध्ये प्राण वाचवता येऊ शकतात. कोणाचा तरी जीवम वाचवण्यासाठी आणि एक चांगले नागरिक व नैतिक कर्तव्य म्हणून अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी नागरिकांनी पुढे यावे.**

**अमोल येडगे, जिल्हाधिकारी**

### चांगला सॅमॅरिटन कायदा काय आहे?

चांगला सॅमॅरिटन कायदा एखाद्या व्यक्तीला, पेमेंट किंवा बक्षीसाची अपेक्षा न करता आणि काळजी किंवा विशेष नातेसंबंधाच्या कोणत्याही कर्तव्याशिवाय, अपघात, अपघात किंवा आपत्कालीन वैद्यकीय स्थितीत जखमी झालेल्या व्यक्तीला त्वरित मदत किंवा आपत्कालीन काळजी व्यवस्थापित करण्यासाठी स्वेच्छेने पुढे येण्याची परवानगी देतो. गुड सॅमॅरिटन कायदा चांगल्या समारिटन्सना रस्ता अपघातात बळी पडलेल्यांचे प्राण वाचवण्यासाठी केलेल्या कृतींवरील छळापासून संरक्षण करतो.

# परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या जन्मोत्सवानिमित्त 'हिंदु राष्ट्र जागृती' अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सनातन संस्थेचे संस्थापक परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या 80 व्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने सनातन संस्थेच्या वतीने प्रतिवर्ष राबवण्यात येणारे 'हिंदु राष्ट्र-जागृती' अभियान यावर्षी श्रीरामनवमीच्या शुभ मुहूर्तावर आरंभ झाले आहे. या अभियानात आतापर्यंत शहरात विविध देवळात देवाला साकडे घालणे, मंदिरांची स्वच्छता आणि पावित्र्यरक्षण करणे, साधनाविषयक प्रवचने असे विविध उपक्रम जिल्हाभरात राबवण्यात आले. या अभियानाची सांगता 'हिंदु एकता दिंडी'च्या आयोजनाने होणार आहे.

या दिंडीमध्ये शहरातील विविध हिंदुत्ववादी संघटना, संप्रदाय, उत्सव मंडळे सहभागी होणार आहेत. दिंडीमध्ये विविध संघटना आपले प्रतीके, ध्वज, फलक, चित्ररथ घेऊन सहभागी होणार आहेत. तसेच शहरातील प्रतिष्ठित मान्यवर, नगरसेवक, राजकीय, सामाजिक, धार्मिक व्यक्ती सहभागी होणार आहेत. दिंडीस 21 मे रोजी सायंकाळी 5 वाजता स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, समर्थनगर येथून प्रारंभ होणार असून पैठण गेट, गुलमंडी मार्गे नारळी बाग येथील पावन गणपती मंदिर मैदानाजवळ समारोप होणार आहे.

तरी जास्तीत जास्त हिंदूंनी या दिंडीत सहभागी होण्याचे आवाहन सनातन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.



# यांत्रिकीकरणाऐवजी मानवीकरणावर भर दिल्यास उत्तम निवडणूक व्यवस्थापन शक्य : प्रो. रजनीश कुमार शुक्ल

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** यांत्रिकीकरणाऐवजी मानवीकरणावर भर दिल्यास उत्तमम निवडणूक व्यवस्थापन शक्य आहे असे प्रतिपादन महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. रजनीश कुमार शुक्ल यांनी केले. ते 18 मे रोजी प्रादेशिक केंद्र प्रयागराजतर्फे निवडणूक व्यवस्थापनात माध्यम संशोधनाची भूमिका या विषयावर आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे अध्यक्ष म्हणुन बोलत होते.

ते म्हणाले की माध्यम संशोधन केवळ डेटा विश्लेषणाने समजू शकत नाही किंवा केवळ तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्तेवर अवलंबून राहून अचूक डेटा मिळवता येत नाही. त्यात विश्वसनीय डेटा आहे की नाही, डेटा संशोधकाने गोळा केला आहे की अन्य कोणाकडून हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. मानवी दृष्टिकोनातून निवडणूक व्यवस्थापन समजून घेणे महत्त्वाचे आहे. निवडणुकीचे निकाल आपल्या बाजूने आणण्यासाठी राजकीय पक्ष निवडणूक व्यवस्थापन करतात. उपलब्ध डेटाच्या विश्वासार्हतेनुसार निवडणूक निकाल निश्चित केले जातात असे ही ते म्हणाले.

वक्ते म्हणून राजकीय विश्लेषक आणि स्तंभलेखक श्री हर्षवर्धन त्रिपाठी म्हणाले की नवीन माध्यमांनी सर्वसामान्यांना जोडले आहे. सोशल मीडियाच्या युगात राजकारण, धर्म आणि जातच नव्हे तर सर्वसामान्यांचे प्रश्नही निवडणुकीचे निकाल ठरवत आहेत. सांप्रदायिक चौकटीत भारताच्या सांस्कृतिक वारशाचा मागोवा घेतल्याने चुकीचा डेटा मिळतो. निवडणूक विश्लेषकांनी निवडणुकीच्या काळात देशाचा सांस्कृतिक वारसा समजून घेणे आणि त्याचे विश्लेषण करणे आवश्यक आहे असेही ते म्हणाले.

प्रमुख वक्ते भारतीय जनसंचार संस्था, नवी दिल्लीचे महासंचालक प्रो. संजय द्विवेदी म्हणाले की, माध्यम कर्मचाऱ्यांनी जबाबदार आणि कर्तव्यदक्ष असले पाहिजे. संपादकांच्या विचारांच्या आधारे जनमत तयार करण्याची प्रक्रिया आता बंद झाली आहे. आज सर्वसामान्य माणूस आपल्या अनुभवलेल्या वास्तवाच्या जोरावर निवडणुकीचे निर्णय घेत आहे. आज माध्यमांच्या निवडक दृष्टिकोनाने वस्तुस्थिती चुकीची ठरवली आहे. संशोधनाच्या दृष्टीकोनातून सार्वजनिक भान केंद्रस्थानी ठेवून बोलण्याची गरज आहे. निवडणूक व्यवस्थापनात माध्यम संशोधनाबाबत सर्वसामान्यांच्या भावना ओळखणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

प्रादेशिक केंद्र प्रयागराजचे अकादमिक निदेशक प्रो. अखिलेश कुमार दुबे यांनी पाहुण्यांचे स्वागत व परिचय करून दिला. कार्यक्रमाचे संचालन डॉ.अख्तर आलम यांनी केले तर आभार डॉ.शिखा शुक्ला यांनी मानले. या चर्चासत्रात प्रत्यक्ष व आभासी माध्यमातून शिक्षक, संशोधक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुन्हा दोन बालविवाह थांबविण्यात प्रशासनाला यश

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** जिल्ह्यातील फतापूर ता. नेर व दारव्हा तालुक्यातील तिवसा आनंदनगर या दोन गावामध्ये अल्पवयीन बालिकेचे बालविवाह होत असल्याबाबत गोपनीय माहिती जिल्हा बाल संरक्षण कक्षास प्राप्त झाली होती. त्यानुसार जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे विधी तथा परीविक्षा अधिकारी महेश हळदे, माहिती विश्लेषक सुनील बोक्से व सामाजिक कार्यकर्ता आकाश बुरैवार यांनी पोलीस स्टेशन लाडखेड ता. दारव्हा चे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामकृष्ण भाकडे, बीट जमादार अनिल सांगडे, नेर पोलीस स्टेशन चे पोलीस नाईक वानखेडे, सरपंच फतापूर श्याम वानखेडे, अंगणवाडी सेविका फतापूर व तिवसा यांचे मदतीने १८ मे २०२२ रोजी बालविवाह थांबविण्यात आले. यामध्ये गावातील उपस्थित नागरिकांना बालविवाह प्रतिबंधक कायद्यावर मार्गदर्शन करण्यात आले. सदर दोन्ही बालविवाह जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी ज्योती कडू व जिल्हा बाल संरक्षण अधिकारी देवेंद्र राजूरकर यांचे मार्गदर्शनात थांबविण्यात आले. नागरिकांनी बालविवाहाची माहिती 1098 या चाईल्ड लाईनवर प्रशासनाला द्यावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.



# भीम बुद्ध सिल्वर सेवाभावी संस्थेतर्फे बुद्धपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महामाया शुद्धोधन कॉलनी, जलगंगा सोसायटी परिसर या ठिकाणी भिम बुद्ध सिल्वर सेवाभावी संस्था अध्यक्ष अर्जुन पवार बॉबी यांनी बुद्धपौर्णिमेच्या कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे साजरा केला. गेल्या एकवीस वर्षापासून राजू बाबा पवार राजश्री पवार हे दांपत्य बुद्ध पौर्णिमा साजरी करतात कार्यक्रमाचे वैशिष्ट्ये असे की, वर्षांची प्रत्येक महिन्याची पौर्णिमा एका कुटुंबाकडून साजरी केली जाते.

बुद्ध पौर्णिमानिमित्त सर्व वर्षभरात पौर्णिमा साजरी करणाऱ्या ११ दाम्पत्यांचा पर्यावरण संरक्षण वृक्षरूपसह प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला तसेच मोठ्या प्रमाणात महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. भारतीय समाजातील प्रत्येक धर्माचे ज्येष्ठ नागरिक, नेते, कार्यकर्ता त्यांची देखील याप्रसंगी सन्मान करण्यात आला. दिपप्रज्वलन रियाज अली यांच्या हस्ते करण्यात आले. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजन नाना साळवे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी निरंजन भतवाल, महेश मिस्तरी, प्रभाताई परदेशी, सरोजताई कदम, विमलताई बेडसे, गोपी ढीवरे, रफिक शेख, भुषण पाटील, किशोर शेलार, अनिल पाटील, राज चव्हाण, अमित पवार, शंकर खरात, नरेंद्र चौधरी, संजय जवराज, योगेश ईशी, संजय अहिरे आदी मान्यवर उपस्थित होते. राजूबाबा पवार, बॉबी पवार, राजश्री पवार, आम्रपाली पवार, नितीन जमदाडे, प्रवीण मोरे, रवींद्र सरदार, विक्की धिवरे, राज ठाकूर, सागर देवरे, सोनू मोकळे, शफिक अन्सारी, रोहित कटारिया, दीपक कोळी, विशाल चव्हाण, मनिष मोरे, राजू सूर्यवंशी, रामभाऊ, राजु खैरणार, दिनेश जगताप, अमोल खैरनार, राम गवळी, किरण पवार, आम्रपाली पवार आदिनी कार्यक्रम प्रसंगी परिश्रम घेतले.

# सपोनि देविदास वाघमोडे यांना दिली कौतुकाची थाप

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथील फर्दापूर पोलीस ठाण्याचे पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे व ठाणे अंमलदार यांना पोलीस अधीक्षक कार्यालय औरंगाबाद ग्रामीण येथे दि.१९ रोजी यांना उत्कृष्टपणे गुन्हे तपास करून गुन्हा उघडकीस आणणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पोलीस अधीक्षक औरंगाबाद यांनी प्रशंसापत्र पत्र देवुन गौरव करून दिली. औरंगाबाद जिल्ह्यातील दहा अधिकारी यांना प्रशंसापत्र देवुन गौरव करून कौतुकाची थाप दिली.

औरंगाबाद काल दि.19 रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय येथे मासिक गुन्हे आढावा बैठकीच्या दरम्यान मनिष कलवानिया, पोलीस अधीक्षक यांनी जिल्हयातील गुंतागंतीचे तसेच क्लिष्ट अशा गुन्हयांचा सचोटीने मागोवा घेवुन शास्त्रशुध्द तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा त्याचप्रमाणे गोपनीय बातमीदार नेमुन दाखल गुन्हयांचा यशस्वी व उत्कृष्टपणे उकल करून 11 गुन्हयांत आरोपी निष्पन्न करून जेरबंद केले आहे. या कामगिरी बाबत तपास अधिकारी व अंमलदार यांचा उत्साह वाढवा या करिता पोलीस अधीक्षक यांनी खालील नमुद पोलीस अधिकारी व अंमलदार यांना प्रशंसापत्र देवुन त्यांच्या कौशल्य युक्त तपासाचा गौरव करून त्यांचे सपोनि देवीदास वाघमोडे यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली आहे.

सदरची बाब इतर अधिकारी व कर्मचारी यांना उत्कृष्ट कामगिरी करण्या करिता निश्चितच प्रोत्साहन व स्फूर्ती देईल. यावेळी सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, प्रभारी अधिकारी, शाखा अधिकारी यांचेसह पोलीस अंमलदार उपस्थित होते. यामुळे फर्दापूर परिसरात सपोनि देवीदास वाघमोडे यांचे कौतुक केले जात आहे.




# ‘करिअर कट्टा’मध्ये मॉडेल डिग्री कॉलेज प्रथम

## राज्यस्तरीय आदर्श प्राचार्य म्हणून डॉ. चंद्रसेन कोठावळे सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा उपक्रमाअंतर्गत 17 मे रोजी “सपकाळ नॉलेज हब नाशिक” येथे महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. मॉडेल डिग्री कॉलेज घनसावंगीचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांना उत्कृष्ट आदर्श राज्यस्तरीय पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या शुभहस्ते देण्यात आला. तसेच औरंगाबाद विभागातून मॉडेल डिग्री कॉलेज घनसावंगी सर्वप्रथम येण्याचा बहुमान प्राप्त झाला. या पुरस्काराचे स्वरूप सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र आणि (11,000) अकरा हजार रुपये रोख रक्कम असे आहे. नाशिक येथील सपकाळ नॉलेज हब याठिकाणी हा सन्मान सोहळा यशवंत शितोळे, डॉ. सोनाली लोहार, सहसंचालक नाठे, सपकाळ नॉलेज हबचे अध्यक्ष रवींद्र सपकाळ, कल्याणी सपकाळ, (उपाध्यक्ष) यांच्या उपस्थित संपन्न झाला. या बद्दल प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे आणि करिअर कट्ट्याचे समन्वयक प्रा. उदय पवार यांचे डॉ. कनुलाल विटोरे, डॉ.भीमराव पूंडगे, डॉ.बाळासाहेब सोनवणे, प्रा.खंडू नवखंडे, प्रा.ज्ञानेश्वर खोजे, डॉ. ऋषिबाबा शिंदे, वाल्मीक मेश्राम, डॉ. संभाजी मराठे, डॉ. संतोष गायकवाड, प्रा. भागवत गोरे, प्रा. बाळासाहेब वरखडे, डॉ. शरद सुबुगडे, डॉ. विठ्ठल लोंढे, अनिल तुपकर, प्रा.शरद बागडे, प्रा. सुधीर कुमार राठोड, प्रा. विनोद बनसोडे, गणेश सुरासे, दीपक कांबळे, नेमिनाठ मुळे, सतीश ब्रहांने, अर्जुन साबळे, गणेश तारगे, देवराम सोमवारी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

मनोजवं मारुततुल्यवेगमं
जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं
श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती औरंगाबाद
सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुख:तू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977

# प्रणव कोरडेचा उपांत्य फेरीत प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जागतिक अव्वल मानांकित खेळाडू आर्यन शहा बरोबर होणार सामना, ऑल इंडिया टेनिस फेडरेशन च्या टेनिस टूर्नामेंट सुपर सीरिज मध्ये अहमदाबादमधील ACE टेनिस अकॅडमी द्वारा आयोजित टूर्नामेंट मध्ये प्रणव कोरडे याने मुख्य ड्रॉच्या प्रथम फेरीतमध्ये गुजरातच्या अल्टो हॉल टेनिस अकॅडमीच्या समर्थ सहिता याचा 6-4, 6-7, 7-5 असा पराभव केला. तसेच दुसऱ्या फेरीमध्ये गुजरातचा त्याच अकॅडमीचा खेळाडू चींमय पटेलचा 6-3, 6-1 असा सरळ सेटमध्ये पराभव केला व उपांत्यपूर्व फेरीमध्ये प्रवेश करून गुजरातचा याच टेनिस अकॅडमीचा खेळाडू परमवीर चावडा याचा सरळ सेटमध्ये सिक्स 6-2,6-2 अशा सरळ सेटमध्ये पराभव केला आणि उपांत्य फेरीच्या सामन्यात प्रवेश केला. त्याचा सामना जागतिक अव्वल मानांकित खेळाडू गुजरातचा जयेश शहा याच्याबरोबर होणार आहे. प्रणव कोरडे यांची जागतिक रॅंकिंग 1500 अशी असून तो औरंगाबादच्या इंडोरन्स एमएसएलटी टेनिस अकॅडमीचा खेळाडू आहे.त्याच्या पुढील वाटचालीस औरंगाबाद येथील क्रीडा रसिकांनी आणि मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.



# औरंगाबादेत १६ डब्यांची पीटलाइन मंजूर केल्याबद्दल रेल्वेमंत्र्यांचे अभिनंदन




आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शहरात १६ डब्यांची पिटलाइन मंजूर केल्याबद्दल नवी दिल्लीत रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे औरंगाबादवासीयांच्या वतीने भाजपच्या राष्ट्रीय सचिव विजया रहाटकर यांनी विशेष अभिनंदन केले. यावेळी केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांनी लिहिलेले ‘द राइज ऑफ दि बीजेपी’ हे गाजत असलेले पुस्तकही त्यांना भेट दिले.
रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील व अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या धडपडीला अतिशय कार्यतत्पर आणि कर्तबगार असलेल्या रेल्वेमंत्र्यांनी सकारात्मक सकारात्मक प्रितसाद दिला. शहरातील उद्योजकांच्या शिष्टमंडळाला घेऊन मीदेखील रेल्वेमंत्र्यांना भेटले होते. तसेच यासंदर्भात मराठवाडा रेल्वे कृती समितीच्याही संपर्कात मी होते. आम्हा सर्वांच्या प्रयत्नांना छान यश आल्याचा आनंद आहे. असेच मिळून शहराचे अन्य प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नरत राहू, असे विजया रहाटकर या वेळी म्हणाल्या.

DON’T NEGLECT YOUR HEALTH
HEALTH IS WEALTH
A TRUSTED SUPAR MARKET IN CITY



MAHAVIR
GHAR SANSAR

- Wholesale & Retail
- Kirana, Dry Fruits, Spices
- Crockery, Home Appliances
- Home Cleaning Material, Steel & Aluminium
- Plastic Items & Many More

Sumit 7620111118
Rajesh Jain 758834738
Ramesh Jain (Crockery) 9860481142 7620111117
Whatsapp Order & Any Order 9850017181
Delivery Status 9021395308 9657398232
Wholesale Enquiry 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. Road, Chelipura, Shahgunj, Aurangabad
Plot No. A25, Opp MIDC Police Station MIDC Chikalthana, Aurangabad



SP
SP Entertainer
Singers Pride | Heart to Heart Music
@ Musical Events @ Stage Shows
@ Party / Functiones
Track Showes + LED Wall
Marathi - Hindi old & new Songs
Ghuzales, Bhajans / Natya Geet
Singing Classes on Karaoke Track
You Can Start your Own Business




S.P. Deshpande
Shant Prabha 120, TilakNagar,
Aurangabad, 9730527669

# शासकीय सेवा जीव ओतून करावी : मुख्याधिकारी प्रियंका टोंगे

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शासकीय सेवा बजावत असताना केवळ वेतनासाठी काम न करता दिलेली जबाबदारी योग्य पध्दतीने हाताळून वेगळा ठसा निर्माण करावा. दरम्यान केलेल्या कामाचा आदर्श इतरांनी घ्यावा अशी कामगिरी केली तर त्याचे खरे पलीत होईल. आपली सेवा बजावताना जीव ओतून काम केले तर तुमचे कर्तृत्व ठळकपणे उमटल्याशिवाय राहत नाही, असे प्रतिपादन भोकर पालिकेच्या मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांनी गुरुवारी केले आहे.



येथील नगर पालिकेतील वसुली लिपिक श्रीधर गणपत कदम हे सेवानिवृत्त झाल्याने पालिकेत त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला आहे. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपिठावर जावेद इनामदार, पत्रकार बी.आर.पांचाळ, बाबूराव पाटील, रवी महाबळे, अभियंता जमदाडे, संजय नगराळे, संतोष सुनकरवार, अशोक डोंगरे, संदिप श्रीरामवार यांची उपस्थिती होती.

श्रीमती टोंगे म्हणाल्या की, आपल्या कूटुंबातील सदस्यांना ज्याप्रमाणे प्रामाणिक राहून संसार नेटाने पूढ नेतो तोच भाव मनी ठेवून शासकीय सेवेत काम केले तर आपली वेगळी छबी निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. केवळ वेळ वाया घालवून वेतनापूरते काम करू नये. सामाजिक भावना अंगीकारून समाजाचे काही देणे आहे याचे भान ठेवून सेवा करणे गरजेचे आहे. आपल्या कुशल कामाचा आदर्श इतरांनी घ्यावा अशी कामगिरी केली तर आपले नाव अजरामर राहिल असे सांगितले आहे.

सेवानिवृत कर्मचारी श्रीधर कदम यांचा मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांनी सपत्नीक शाल, श्रीफळ, साडीचोळी देऊन गौरव केला आहे. यावेळी पालिकेतील सर्व कर्मचाऱ्यांची बहुसंख्येनी उपस्थिती होती.

## बेकायदा होर्डींग, बॅनरबाजी निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भाई का बर्थ डे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**आष्टी :** विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, नेते यांच्या वाढदिवसानिमित्त लावण्यात येणाऱ्या विनापरवानगी बेकायदा होर्डींग व बॅनरबाजीमुळे शहराचे विद्रुपीकरण होत असून शहर, तालुक्याच्या ठिकाणी रस्त्याच्या मधोमध असणारे विद्युत पोल लाईटसाठी नसून होर्डींग व बॅनरबाजीसाठी लावण्यात आलेले आहेत अशी धारणा झाली असून त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे.

बॅनर नागरीकांची डोकेदुखी बनले असून याविषयी तक्रार केल्यानंतर नियमानुसार गुन्हे दाखल व्हायला हवेत परंतु राजकीय दबावापोटी गुन्हे दाखल करण्यात येत नाहीत, तसेच विनापरवाना होर्डींग असल्याने शासकीय नियमानुसार महसूल बुडत असताना संबंधित नगरपरिषद, नगरपंचायत अधिकाऱ्यांकडून त्याकडे दुर्लक्ष करताना दिसून येत असून याच्या निषेधार्थ व संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी यासाठी आज सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कुत्र्यांसाठी केक कापून "भाई का बड्डे" आंदोलन करण्यात आले.

आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते रामनाथ खोड, शेख युनुस चऱ्हाटकर भ्रष्टाचार निर्मूलन समिती तालुकाध्यक्ष बीड, सामाजिक कार्यकर्ते मोहम्मद मोईज्जोदीन, शेख मुबीन, उपाध्यक्ष मराठवाडा ऑल इंडीया पॅथर सेना नितिन सोनावणे, प्रेम कांबळे, सुशील कांबळे, सुशिल कांबळे ऑल इंडीया पॅथर सेना नेते बीड जिल्हा, अविनाश वडमारे, ऑल इंडीया पॅथर सेना सदस्य आदि सहभागी झाले होते.






## श्रृंगारवाडी सेवा सहकारी सोसायटीवर छत्रपती शेतकरी विकास पॅनलचा झेंडा

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** तालुक्यातील श्रृंगारवाडी येथील सेवा सहकारी सोसायटी भारतीय जनता पक्षाचे नेते तथा छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन मोहनराव जगताप यांच्या ताब्यात आली.

प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, श्रृंगारवाडी ता.माजलगाव येथील सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक भारतीय जनता पक्षाचे नेते मोहनराव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली व कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नारायणराव मुळे व नगरसेवक शरद यादव यांचा नेतृत्वाखाली छत्रपती शेतकरी विकास पॅनल उभा करण्यात आला होता. या निवडणुकीत पॅनलचे सर्वच्या सर्व 13 उमेदवार बहुमताने निवडून आले. या सोसायटीमध्ये रामभाऊ यादव, विनायक नाना मुळे, गणपत जगताप, जगन मुळे, अंगद जगदाळे, राम रुस्तुम धनवडे, राम ज्ञानोबा धनवडे, हरिभाऊ राठोड, भास्कर जाधव, लहू यादव, नारायण जगताप, पांडुरंग बागल, संजीवनी राऊत यांचा भारतीय जनता पक्षाचे नेते मोहनराव जगताप यांनी छत्रपती सहकारी साखर कारखाना येथे शाल श्रीफळ देऊन सत्कार केला.

यावेळी माजी सभापती नारायणराव मुळे, नगरसेवक शरद यादव, ज्ञानोबा धनवडे, प्रमोद मुळे, अशोक जगदाळे, गोवर्धन घाटे, बालाजी जगताप, बालाजी यादव, नारायण जगताप, निलेश मुळे, बाबुराव धनवडे, अंबादास यादव, अविनाश सवासे सह कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिवम तोष्णीवाल व शिवानी चांडक यांचे एम.बी.बी.एस.परीक्षेत यश

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** नाशिक आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या एम.बी.बी.एस. परिक्षेच्या शेवटच्या वर्षाच्या परिक्षेत माजलगाव शहरातील शिवम रामचंद्र तोष्णीवाल व शिवानी रमेश चांडक या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

शिवानी रमेश चांडक हिने वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय, नाशिक तर शिवम रामचंद्र तोष्णीवाल याने बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथून एम.बी.बी.एस. चे उच्चशिक्षण पूर्ण केले. दोघांचे प्राथमिक शिक्षण माजलगाव येथेच पूर्ण झालेले आहे. त्यांच्या या यशाबद्दल माहेश्वरी





सभेचे बीड जिल्हाध्यक्ष प्रदीप चितलांगे, संतोष सोहनी, गोविंद बजाज, जे.सी. झंवर, राजेंद्र इंदानी, तालुकाध्यक्ष विनोद जाजू, तालुका सचिव उमेश जेथलिया, बालप्रसाद भुतडा, विनोद बजाज, प्रा. कमलकिशोर लड्डा आदींनी अभिनंदन केले.

## गर्भनलिकेतील गर्भ फुटल्याने गंभीर प्रकृती झालेल्या महिलेचे वाचविले प्राण !

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** गर्भनलिकेतील गर्भ फुटून महिलेची प्रकृती गंभीर बनली होती. सदरील महिलेवर जिल्हा रुग्णालयात तत्काळ शस्त्रक्रिया केल्याने तिचे प्राण वाचले आहेत. सदरील यशस्वी शस्त्रक्रिया जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुरेश साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांनी केल्याने या महिलेला जीवदान मिळाले आहे. माजलगाव तालुक्यातील विरला डुब्बा येथील एका महिलेच्या गर्भनलिकेतील गर्भ फुटून तिची प्रकृती गंभीर बनली होती. अशा परिस्थितीत तिला जिल्हा रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले होते. या महिलेवर तत्काळ शस्त्रक्रिया करण्यात आली. ही शस्त्रक्रिया दुर्बिणद्वारे करण्यात आली. शस्त्रक्रिया करतावेळी महिलेची प्रकृती अत्यंत नाजूक होती. तिच्या हिमोग्लोबिनचे प्रमाण 6 टक्के होते. शस्त्रक्रिया दरम्यान दीड लिटर रक्तस्त्राव पोटामध्ये झाल्याचे दिसून आले. वेळीच शस्त्रक्रिया केल्याने महिलेला जीवदान मिळाले. ही शस्त्रक्रिया डॉ.सुरेश साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.अभिषेक जाधव, डॉ.मोराळे, डॉ.विद्या केदार, डॉ.शाफे, वाघमारे, जयश्री उबाळे यांनी केली आहे.

# अंबऋषी संस्थानला 'ब' दर्जा देण्यासाठी प्रस्ताव सादर करा

### आमसरीतील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत राज्यमंत्री सत्तार यांचे निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

**अजिंठा :** नैसर्गिक व आध्यात्मिक वारसा लाभलेल्या सिल्लोड तालुक्यातील आमसरी येथील श्री. अंबऋषी संस्थानला 'ब' दर्जा देण्यासह येथे पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी पहिल्या टप्प्यात 2 कोटी रुपयांचा सविस्तर आराखडा तयार करून शासनास तातडीने परिपूर्ण प्रस्ताव सादर करा असे निर्देश महसुल तथा ग्रामविकास राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांनी अधिकाऱ्यांना दिले. आमसरी येथील देवस्थान व परिसराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांनी यावेळी दिली.

आमसरी ता. सिल्लोड येथील श्री. अंबऋषी संस्थान येथे भाविकांची संख्या वाढावी तसेच येथील स्थानिकांना रोजगार व व्यवसायाला चालना मिळावी यासह येथे मूलभूत व पायाभूत सुविधा निर्माण करून विकास कामे हाती घेण्याच्या दृष्टीने राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली सर्व शासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करीत असतांना राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांनी वरील निर्देश दिले.

बैठकीस श्री.अंबऋषी संस्थांनचे पिठाधिश महंत कृष्णगिरी महाराज, उपविभागीय अधिकारी संजीव मोरे, तहसीलदार



विक्रमसिंग राजपूत, उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार मराठे, गटविकास अधिकारी डॉ. अशोक दांडगे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता विजय सोनवणे, सिल्लोड शाखा अभियंता चाटे, फर्दापूर शाखा अभियंता धर्मराज दराडे, सोयगाव शाखा अभियंता नितीन राठोड, प्रधानमंत्री, मुख्यमंत्री सडक योजनेचे उपविभागीय अभियंता उमेश लिंभारे, कनिष्ठ अभियंता मंगेश डापके, जलसंपदा विभागाचे उप कार्यकारी अभियंता मिलिंद नाकाडे, सोयगाव शाखा अभियंता अक्षय सौदे, तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर बरदे, तालुका आरोग्य अधिकारी नासेर पठाण, जलसंधारण विभागाचे उपविभागीय अभियंता यतीन कोठावळे, सोयगाव शाखा अभियंता रोशन महाजन, सिल्लोड शहर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक अशोक मोदिराज, अजिंठा पोलीस स्टेशनचे एपीआय अजित विसपुते, वीज वितरण विभागाचे उप कार्यकारी अभियंता सचिन बन्सोडे, भास्कर कोळे, सहायक अभियंता दीपक साखळे, अजिंठा वनपालक्षेत्र अधिकारी निलेश सोनवणे, सिल्लोड वनपालक्षेत्र अधिकारी संजय भिसे, शेषराव तांबे, पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी दिगंबर रायबोले, जिल्हा परिषद सिंचन विभागाचे उप अभियंता सुभाष महाजन, जि.प. बांधकाम विभागाचे शाखा अभियंता पांडुरंग चौधरी आदी अधिकाऱ्यांसह माजी पं.स. सभापती रेखा किशोर जगताप, पं.स. सदस्य शेख सलीम, माजी जि.प. सदस्य भिका वाघ, आमसरी सरपंच वंदना विष्णू दांडगे, राजू बाबा काळे, सुधाकर काळे, कंत्राटदार अशोक देशमुख, धोत्रा येथील जीवनसिंग जाधव, साहेबराव दांडगे, पानवदोड सरपंच गजानन पऱ्हाळे, पानवदोड बु. उपसरपंच प्रमोद दौड, संदीप इंगळे, श्रावण इंगळे, ज्ञानेश्वर जाधव, राजू जाधव, देवराव पाडळे, सीताराम जाधव, मोहन ढोले आदींसह शिवना, आमसरी, वाघेरा, मांदणी व परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# आज नांदेडात महाकवी वामनदादा कर्डक जन्मशताब्दी साहित्य संमेलन

## कविसंमेलन, परिसंवाद, एकपात्री, पुरस्कार वितरण, ठराव वाचन आंबेडकरी जलसा आदी भरगच्च कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** आंबेडकरी चळवळीतील महान जलसाकार महाकवी वामनदादा कर्डक यांच्या २०२१-२२ या जन्मशताब्दी वर्षाच्या औचित्याने शहरात आज शनिवारी २१ मे रोजी महाकवी वामनदादा कर्डक जन्मशताब्दी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी यशदा पुणे येथील प्रशिक्षण अधिकारी तथा आंबेडकरी साहित्यिक विचारवंत डॉ. बबन जोगदंड हे राहणार असून भारतीय सिनेसृष्टीतील प्रतिभावान अभिनेते मिलिंद शिंदे यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. याच कार्यक्रमात येथील ज्येष्ठ नाटककार प्रा. दत्ता भगत यांना संयोजन समितीच्या वतीने जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यावेळी माजी उच्च व शिक्षणमंत्री डी.पी. सावंत, महापौर जयश्री पावडे, मनपा स्थायी समिती सभापती किशोर स्वामी, सामाजिक कार्यकर्ते गजानन मुधोळ, अविनाश राऊत, स्वागताध्यक्ष बालाजी इबितदार, निमंत्रक जी.पी. मिसाळे, सत्यशोधक फाऊंडेशनचे अध्यक्ष कोंडदेव हटकर, मानव विकास संस्थेचे राज गोडबोले, संमेलनाच्या संयोजन समितीचे अध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे आदींची उपस्थिती राहणार आहे.



शहरातील कुसुम सभागृहात २१ मे रोजी सकाळी अकरा वाजता एकदिवसीय राज्यस्तरीय महाकवी वामनदादा कर्डक जन्मशताब्दी साहित्य संमेलनास प्रारंभ होणार असून उद्घाटन सत्रात प्रकाशन, जीवनगौरव पुरस्कार, सत्यशोधक फाऊंडेशनचे समाजभूषण पुरस्कार, दशकातील जलसाकार पुरस्कार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. त्यानंतर हिंगोली कथाकार शिलवंत वाढवे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कथाकथन कार्यक्रमात भंडारा येथून ॲड. विशाखा बोरकर, दर्यापूरच्या संघमित्रा खंडारे तसेच नायगाव येथील कथाकार विरभद्र मिरेवाड यांच्या आंबेडकरी कथाकथनाचा कार्यक्रम संपन्न होईल. त्यानंतर दु. ४ वा. महाकवी वामनदादा कर्डक यांच्या गितांमधील समग्र आंबेडकरवाद या विषयावर परिसंवादास प्रारंभ होईल. यात औरंगाबाद येथील प्रख्यात आंबेडकरी विचारवंत तथा समीक्षक प्रा.डॉ. ऋषिकेश कांबळे, यवतमाळ येथील सुनिता काळे सहभागी होणार असून या सत्राच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक तथा विचारवंत प्रा. रविचंद्र हडसनकर हे उपस्थित राहणार आहेत. संमेलनाच्या चौथ्या सत्रात प्रा. विलास भवरे यांचा आयुष्य नांगरतांना आणि रुपेश निकाळजे यांचा क्रांतीचा साक्षीदार हे एकपात्री प्रयोग सादर होतील. समारोपाच्या सत्रात सायंकाळी ठराव वाचन आणि प्रख्यात आंबेडकरी विचारवंत प्रा. सुषमा अंधारे यांचे व्याख्यान होईल. यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ. बबन जोगदंड, मराठा सेवा संघाचे कामाजी पवार, दशरथ लोहबंदे यांची उपस्थिती राहणार आहे. शेवटच्या सत्रात सुप्रसिद्ध जलसाकार प्रतापसिंह बोदडे, कुणाल वराळे, ललकार बाबू यांच्या उपस्थितीत वामनदादांच्या अजरामर गितांचा जलसा सादर होणार आहे. हा जलसा सुप्रसिद्ध भीमगायक क्रांतीकुमार पंडित सादर करणार आहेत. येथील ज्येष्ठ कवी अनुरत्न वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली प्रमोद कांबळे, जनार्दन मोहिते, सज्जन बरडे, प्रेम हनवते, शलिक जिल्हेकर, संजय गोडघाटे, किरण पतंगे, संजय मोखडे, सुनंदा बोदिले, शुभांगी जुमळे, सरिता सातारडे, देवकांत वंजारे यांच्या उपस्थितीत उद्घाटन पूर्व सत्रात विद्रोही काव्य मैफिल रंगणार आहे.

संपूर्ण संमेलनाच्या नियोजनाची तयारी पूर्ण झाली असून यशस्वीतेसाठी एन. डी. गवळे, प्रा. कैलास राठोड, प्रफुल्ल सावंत, डॉ. सी. के. हरनावळे, भीमराव हाटकर, प्रशांत वंजारे, बापू लाभली, एन.टी. पंडित, बाबुराव कसबे, प्रभू ढवळे, नितीन एंगडे, डॉ. राम वनंजे, रमेश कसबे, संजय जाधव, ज्ञानोबा दुधमल, राहुल गवारे, एम. एस. गव्हाणे, आर. पी. झगडे, अशोक मल्हारे, नागोराव डोंगरे, पांडूरंग कोकुलवार, शंकर गच्चे कैलास धुतराज, प्रशांत गवळे, रुपाली वागरे वैद्य, बाबुराव पाईकराव, रणजीत गोणारकर आदी परिश्रम घेत आहेत.

### कुसुम सभागृह परिसरास स्मृतीशेष मिलिंद एंगडे यांचे नाव

**शहरात २१ मे रोजी शनिवारी महाकवी वामनदादा कर्डक जन्मशताब्दी साहित्य संमेलन संपन्न होत असून कुसुम सभागृह परिसराचे आंबेडकरी चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ते स्मृतिशेष मिलिंद एंगडे साहित्यनगरी असे नामकरण करण्यात आले आहे. विचारमंचाला वामनदादांचे शिष्य भीमशाहीर दलितानंद यांचे नाव देण्यात आले असून प्रवेशद्वाराला पँथर रोहिदास यशवंत ढवळे यांचे नाव देण्यात आले आहे.**

# चंद्रपूरमध्ये पेट्रोल टँकर आणि ट्रकचा भीषण अपघात

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर-मूल मार्गावरच्या अजयपूर येथे अपघातात नऊ जणांचा आगीत होरपळून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अजयपूर गावाजवळ गुरुवारी मध्यरात्री रात्री २ ट्रकमध्ये भीषण अपघात झाला. डिझेल वाहतूक करणारा टँकर आणि लाकूड नेणाऱ्या ट्रकमध्ये समोरासमोर धडक झाली. अपघातानंतर टँकरमधील डिझेलमुळे भीषण आगीचा भडका उडालाय. ट्रकचे टायर फुटल्याने आग अधिकच पसरली. मूल-चंद्रपूर अग्निशमन पथकाने मोठ्या प्रयत्नांनंतर ही आग विझवली. या आगीत मृत पावलेल्या प्रवाशांचे मृतदेह जळून खाक झाले.

गुरुवार १९ मे ला रात्री १०.३० वाजताच्या सुमारास वडसा वरून चंद्रपूर ला लाकूड घेऊन येणाऱ्या ट्रक क्रमांक एमएच ३१ सीक्यू २७७० आणि चंद्रपूरवरून मूलकडे जाणारा डीझल टँकर क्रमांक एमएच ४० बीजी ४०६० या दोन वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाल्याने ट्रक ला आग लागली. आगीने बघता बघता भीषण रूप धारण केल्याने संपूर्ण ट्रक व त्यामध्ये असलेले ९ जण जळून खाक झाले.

लाकूड भरलेल्या ट्रक मध्ये वाहनचालक ३० वर्षीय अजय सुधाकर डोंगरे (रा. बल्लारपूर), ३३ वर्षीय प्रशांत मनोहर नगराळे, ३० वर्षीय मंगेश प्रल्हाद टिपले, २५ वर्षीय महिपाल परचाके, ४६ वर्षीय बाळकृष्ण तुकाराम तेलंग, ४० वर्षीय साईनाथ बापूजी कोडापे राहणार नवी देहली, २२ वर्षीय संदीप रवींद्र आत्राम रा. तोहोगाव कोठारी हे सर्व मजूर लाकूड उतरविण्यासाठी चंद्रपूरला येत होते. तर डीझेल टँकर मधील वाहनचालक ३५ वर्षीय हनिफ खान रा. अमरावती, कंडक्टर ३५ वर्षीय अजय पाटील वर्धा हे दोघेही ट्रकला लागलेल्या आगीत होरपळून मृत पावले.






# लाल बावटा शेतमजूर युनियनचे जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्र राज्य लाल बावटा शेतमजूर युनियनच्या औरंगाबाद जिल्हा शाखेच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकाळी १० ते ४ पर्यंत धरणे आंदोलन झाले. भुमीहीनांना जमीन, मजूरांना किमान वेतन, पूरेशे राशन, वृध्दापकाळात पेन्शन, मुलांना मोफत शिक्षण, निराधारांना नियमित अनुदान आदी मागण्यांकडे आजच्या आंदोलनाद्वारे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. तुर्काबाद खराडी, कदीम टाकळी, वावना, निधोना, वाहेगाव, वडोद बाजार, वाळूज, आंबेलोहळ, आळंद, शेरुडी, पाडळी, सिल्लोड आदी गंगापूर, फुलंब्री, सिल्लोड, औरंगाबाद तालुक्यातील सुमारे २५ गावातील भूमीहीन, गायरान धारक, बेघर, रोहयो मजूर यात सहभागी झाले होते. अतिरिक्त जिल्हाधिकारी गव्हाणे यांना लाल बावटा शेतमजूर युनियनचे २० जणांचे शिष्टमंडळ भेटले व विविध मागण्यांचे निवेदन सादर करून चर्चा केली.

आजच्या आंदोलनाचे नेतृत्व लालबावटा शेतमजूर युनियनचे औरंगाबाद जिल्हा अध्यक्ष तथा राज्य उपाध्यक्ष कॉ.प्रा.राम बाहेती, जिल्हा सचिव तथा राज्य सहसचिव कॉ.गणेश कसबे, कॉ.शेख नूर, कॉ.गयाबाई सोनवणे, कॉ.मोबीन बेग, कॉ.विठ्ठल त्रिभुवन, कॉ.हरिभाऊ हाटकर, कॉ.इंदुमती केवट, कॉ.बशीर खान आदींनी केले. शेतमजूर पंचायतचे साथी सुभाष लोमटे, लाल निशाण पक्षाचे कॉ.भीमराव बनसोड, भाकपचे जिल्हा सचिव कॉ.अशफाक सलामी, हॉकर्स, कंत्राटी कामगार व रिक्षा युनियनचे नेते कॉ.अभय टाकसाळ, ऑल इंडिया यूथ फेडरेशनचे विकास गायकवाड आदींनी यावेळी शुभेच्छा दिल्या. त्र्यंबक चौथमल, बबन बोराडे, कैलास थोरात, शाबेरा फैय्याज, रामनाथ काळे, अशोक बत्तीशे, शोभाबाई आव्हाड, नंदु तोडकर, धोंडीराम खोतकर, परमेश्वर बत्तीशे, चंद्रभान काळे, अशोक बत्तीशे, संजय वाघ, भगवान वाघ, कॉ.सलीम, रुखमणबाई श्रिखंडे, कानबाई जाधव, शशिकला तिकटे आदी प्रमुख कार्यकर्त्यांसह सुमारे ७० -७५ जण आजच्या धरणे आंदोलनात उपस्थित होते.

येत्या १३ जून रोजी मुंबई येथे मंत्रालयात लाल बावटा शेतमजूर युनियनचे २५ जणांचे शिष्टमंडळ संबंधित मंत्र्यांना भेटून खालील मागण्या संदर्भात चर्चा करणार आहे. तसेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती दिनी २६ जून रोजी बीड येथे राज्यव्यापी गावरान व वनजमीन हक्क परिषदही लाल बावटा शेतमजूर युनियनच्या वतीने होणार आहे. आज जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात मागण्यांचा समावेश आहे.

